| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १३१ वा | गुरूवार दिनांक ३० जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## अभियानाच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभार्थ्यांना थेट लाभ-आमदार राणाजगजितसिंह पाटील

## तुळजापूर येथे समाधान व महाआरोग्य शिबिर: १,०५० लाभांचे वितरण,७४९ अर्ज स्वीकारले






धाराशिव,दि.२८ जुलै (जिमाका) प्रशासन योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करीत असेल,तर शासकीय योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचतो.'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान व महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून विविध योजनांचा थेट लाभ नागरिकांना दिला जात असून,शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रभावी उपक्रम असल्याचे प्रतिपादन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.

'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान व महाआरोग्य शिबिराअंतर्गत तुळजापूर विधानसभा मतदारसंघस्तरीय समाधान व महाआरोग्य शिबिर आज मंगळवारी २८ जुलै रोजी तुळजापूर येथील वंश मंगल कार्यालयात उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले.या शिबिरात सुमारे १,४०० नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे सभापती विक्रमसिंह देशमुख,धाराशिव पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा कदम,जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम समितीचे सभापती सिद्धेश्वर कोरे,नळदुर्ग नगर परिषदेचे नगराध्यक्ष बसवराज धरणे,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राबविण्यात येत असलेल्या या अभियानाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला.

यावेळी आमदार पाटील म्हणाले,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी भक्कमपणे पाठीशी असून, कृष्णा खोऱ्याचे पाणी आणि विविध उद्योग जिल्ह्यात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जिल्ह्यातील जवळपास एक लाख शेतकऱ्यांना ५०० ते ६०० कोटी रुपयांच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ देण्यात आला आहे.तसेच २,८०० कोटी रुपयांचे वीजबिल माफ करण्यात येणार असून, जिल्ह्यात विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहेत.जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न पुढील तीन वर्षांत एक लाख रुपयांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट असून, महिलांना 'लखपती' बनविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.प्रत्येक गावातील महिलांपर्यंत योजनांचा थेट लाभ पोहोचविण्यात येत असून, 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत महिलांना दरमहा हक्काचा निधी मिळत आहे.त्या निधीचे योग्य आर्थिक नियोजन महिलांकडून केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

अनेक महिला अडचणींवर मात करून सक्षम होत असल्याचे सांगत आमदार पाटील म्हणाले, योजनांची माहिती घेऊन त्याबाबत प्रशिक्षण प्राप्त करून महिलांनी जिद्दीने उद्योग-व्यवसाय उभे केले आहेत. खरीप हंगामातील पीक विम्याची रक्कम कालपासून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. पीक कापणी प्रयोग काळजीपूर्वक व अचूक पद्धतीने करावेत,त्यामुळे महसूल मंडळांमध्ये तफावत राहणार नाही.पंचायत समितीने कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून कामांना गती द्यावी. तसेच मतदार शुद्धीकरण मोहिमेत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा,असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आमदार श्री.पाटील यांच्या हस्ते तुळजापूर पंचायत समितीचे सभापती विक्रमसिंह देशमुख यांच्या संकल्पनेतून ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या अजित अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी रोटरी क्लबचे संजय मैदर्गी व श्री.हंगरगेकर यांना देखील त्यांच्या कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

शिबिरात तुळजापूर व नळदुर्ग नगर परिषद,आरोग्य विभाग,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,भूमी अभिलेख, वन विभाग,महिला व बाल विकास विभाग, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,दुय्यम निबंधक कार्यालय,आरटीओ/वाहतूक शाखा,तुळजापूर पोलीस स्टेशन,जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, पंचायत समिती तुळजापूर,पोस्ट कार्यालय, राज्य मार्ग परिवहन महामंडळ,स्टेट बँक ऑफ इंडिया तसेच तुळजापूर तहसील कार्यालय आदी विभागांनी सहभाग नोंदविला.विविध योजनांची माहिती,प्रत्यक्ष लाभ तसेच अर्ज स्वीकारण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली.या शिबिरात एकूण १,०५० नागरिकांना प्रत्यक्ष लाभांचे वितरण करण्यात आले,तर ७४९ नागरिकांचे विविध योजनांसाठी अर्ज स्वीकारण्यात आले.

घरकुल योजना,आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजना, दिव्यांग लाभ,आरोग्य तपासणी,पीएम-किसान, कृषी यंत्रीकरण,रोजगार व कौशल्य विकास,महिला व बाल विकास, बालसंगोपन,लेक लाडकी योजना,वन विभागाच्या योजना,पोस्ट विभागाच्या बचत व विमा योजना,शिधापत्रिका वितरण,डिजिटल ७/१२ वाटप,विविध प्रमाणपत्रे व दाखल्यांचे वितरण,फार्मर आयडी वाटप,सायबर जनजागृती,वाहतूक नियमांविषयी मार्गदर्शन तसेच महसूल विभागाच्या विविध सेवा नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार अरविंद बोळंगे,धाराशिव तहसीलदार मृणाल जाधव,तुळजापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे नळदुर्ग नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री.जाधवर,अपर तहसीलदार पुरुषोत्तम कोकरे,अपर तहसीलदार प्रमोद गायकवाड,निवासी नायब तहसीलदार प्रियंका लोखंडे तसेच सर्व विभागांचे अधिकारी-कर्मचारी आणि समन्वय पथकाने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन संजय मैदर्गी यांनी केले,तर उपस्थितांचे आभार तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी मानले.

शासनाच्या विविध विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांच्या दारी शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून दिल्याबद्दल उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त करत या उपक्रमाचे स्वागत केले.

## क्राईम न्युज

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद.

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे :आरोपी नामे-बालाजी गोविंदराव सुरवसे, वय ४५ वर्षे, रा. दत्त कॉलनी उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२८.०७.२०२६ रोजी ००.०५ वा. सु.बसस्थानक परिसरातील सुलभ शौचालय समोर उमरगा येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे लोखंडी कत्ती ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेले उमरगा पोलीसांना मिळून आले. यावर पथकाने नमुद लोखंडी कत्ती जप्त करुन फिर्यादी नामे-अतुल मुकुंद जाधव, पोलीस हवालदार नेमणुक पोलीस ठाणे उमरगा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह कलम १३५ मपोका सह कलम २२३ भान्यासं अन्वये उमरगा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांची निर्दयपणे वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल.

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, अजयकुमार विठ्ठल मुलगे, वय ३० वर्षे, रा. किणी सुलतान ता. आळंद जि. कलबुर्गी यांनी दि.२८.०६.२०२६ रोजी कसगी ते जवळगा जाणारे रोडवर काशिनाथ गुरव यांचे शेताजवळ कसगी येथे अशोक लिलॉण्ड बडा दोस्त वाहन क्र केए ३२ सी ०७२१ मध्ये ५ गायी असा एकुण ८४,००० किंमतीचे वाहनासह २,८४,००० किंमतीचे गोवंशी जनावरे त्यांचे चारपाण्याची व्यवस्था न करता वाहना मध्ये दाटी वाटीने भरुन वाहतुक करत असताना उमरगा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(डी), ११(१) (ई) सह कलम ४७, ५४, ५६ प्राण्याचे परिवहन नियम १९७८ प्रमाणे अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### टिव्ही,मिक्सर, चांदीचे दागिणे व रोख रकमेची अज्ञाताने केली चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी विकास गोरोबा कोळगे, वय ३२ वर्षे, रा. पुजारी नगर नळदुर्ग रोड तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने तोडुन आत प्रवेश करुन घरातील सोनी कंपनीचा ५५ इंचीचा एलईडी टी.व्ही. मिक्सर, चांदीचे दागिने व रोख रक्कम २५,००० असा एकुण ५२,०००किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विकास कोळगे यांनी दि.२८.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२८जुलै रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १६० कारवाया करुन १,०१,७०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## धाराशिव पोलिसांची अवैध गुटखा विरोधी पोलीसांची कारवाई!



धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक २७/०७/२०२६ रोजी सायंकाळी परीक्षावधीन पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मोहिते यांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, धाराशिव शहरातील शम्स चौक परिसरात एका टोयोटा इनोव्हा गाडीमधून अवैध गुटखा आणून, त्याची अन्य ठिकाणी बेकायदेशीर विक्री करण्यासाठी दुसऱ्या वाहनात शिफ्टींग केली जात आहे. वगैरे बातमीच्या आधारे परीक्षावधीन पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते व पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोउपनि अक्षय डिघोळे, सपोफौ / ३०० क-हाळे, पोअं/ १४५ जाधवर, चालक पोहेकॉ / ४५६ रणनवरे आणि पोअं/ १०४८ नाईकवाडी यांच्या पथकाने वरीलप्रमाणे मिळाले बातमी ठिकाणी गाझी स्कूलजवळ अचानक छापा टाकला असता, सदर छाप्या दरम्यान आरोपी सलमान गुलाम शेख, रा. इंदापूर, ता. वाशी, जि. धाराशिव हा इनोव्हा चारचाकी क्रमांक एम एच २४ व्ही १६४२ मधून गुटख्याचे गोणी काढून महिंद्रा मालवाहतूक पिकअप क्रमांक एम एच १२ एस एफ ४०७० मध्ये शिफ्ट करत असताना रंगेहात पकडला गेला. वर नमूद सलमान गुलाम शेख याच्या ताब्यामध्ये मिळून आलेल्या गोणीमध्ये महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याची पॉकेट मिळून आले असून, त्याचे किंमतीसह सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे- १. बादशहा गुटखा- २,७९५ पॅकेट किंमत रुपये ४,१९,२५०/- २. गोवा गुटखा (लाल)- ७० पुडे - किंमत रुपये १७,५००/- ३. गोवा गुटखा (हिरवा - सिल्व्हर)- ९५ पुडे किंमत रुपये १६,६२५/४. डायरेक्टर स्पेशल पान मसाला- ६३ पॅकेट - किंमत रुपये २७,२१६/५. निळया रंगांचा विमल पान मसाला- ३९६ पॅकेट किंमत रुपये ७८,४०८/६. निळया रंगांचा त१ तंबाखू किंग पॅक- ३९६ पॅकेट किंमत रुपये ८,७१२/७. विमल पान मसाला (लाल-निळा रंग) ३८७ पॅकेट किंमत रुपये ४०, ६३५ /८. त१ तंबाखू किंग पॅक ३८७ पॅकेट किंमत रुपये १७,४१५ /- १०. ९. राज निवास सुगंधित पान मसाला (लाल) ५० पॅकेट किंमत रुपये ७,५००/ राज निवास सुगंधित पान मसाला (निळा ४० पॅकेट किंमत रुपये ३,६००/प्रिमियम KNO ZAFRAVI ZARDA ४० पॅकेट किंमत रुपये ३,८४०/१२. प्रिमियम शॉट लक्झरी च्युबिंग टोबॅको ६३ पॅकेट किंमत रुपये ४,५३६/किंमत रुपये १९. ३६०/- ११.विमल पान मसाला (हिरवा रंग) ११० पॅकेट १३.१४. त१ तंबाखू (हिरवा रंग) ११० पॅकेट किंमत रुपये ४,८४०/१५. सिल्व्हर रंगाचा ५०० ग्रॅम तंबाखू १२ पॅकेट किंमत रुपये ३०००/१६. रत्ना छाप तंबाखूची डब्बी २८ किंमत रुपये २,६६०/१७. विमल पान मसाला (६ पाऊच) ६० पॅकेट किंमत रुपये ६,४८०/त१ तंबाखू (६ पाऊच) ६० पॅकेट किंमत रुपये ७२०/-१८.१९. महिंद्रा पिकअप (एम एच १२ एस एफ ४०७०) चारचाकी वाहन जु.वा. कि. अ. ६,००,०००/-२०. टोयोटा इनोव्हा गाडी (एमएच २४व्ही १६४२) चारचाकी वाहन जु.वा. कि. अ. ५,००,०००/- असा एकूण किंमत रुपये १७,८२,२९७/- एवढा वरील वर्णनाचा व किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, पोलीस ठाणे धाराशिव शहर येथे आरोपीविरुद्ध अन्न व औषध प्रशासन कायदा तसेच अन्न सुरक्षेच्या संबंधित कलमांनुसार कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर मॅडम, मा. अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, यांचे मार्गदर्शनाखाली परीक्षावधीन पोलीस उप अधीक्षक श्री. अमोल मोहिते साहेब, पोलीस निरीक्षक श्री. कुमार दराडे, पोउपनि अक्षय डिघोळे, सपोफौ / ३०० क-हाळे, पोअं/ १४५ जाधवर, चालक पोहेकॉ / ४५६ रणनवरे आणि पोअं/ १०४८ नाईकवाडी यांच्या पथकाने यशस्वतीरीत्या पार पाडली आहे.

## गुरुपौर्णिमा निमित्त दत्त मंदिर जुनोनी ट्रस्टतर्फे वृक्षारोपण, भजन व अन्नदान कार्यक्रम संपन्न



जुनोनी, ता. धाराशिव (प्रतिनिधी)- गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त दत्त मंदिर जुनोनी ट्रस्ट, जुनोनी यांच्या वतीने वृक्षारोपण, भजन व अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यात्म, समाजसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात मंदिर परिसरात वृक्षारोपण करून करण्यात आली. त्यानंतर दत्तभक्तांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात भजन कार्यक्रम पार पडला. यानंतर भाविकांसाठी अन्नदानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास गावातील तसेच पंचक्रोशीतील नागरिक, शेतकरी, युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास मा. उमेश सिरसाठे सर, मा. शरदचंद्रजी पवार (असंघटित कामगार जिल्हाध्यक्ष), मा. वाळवे सर (मानवी हक्क अभियान, तालुका अध्यक्ष) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच सामाजिक कार्यकर्ते अमरदीप गरड यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून उपक्रमास शुभेच्छा दिल्या. दत्त मंदिर जुनोनी ट्रस्टचे सचिव भालचंद्र मुळे यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. समाजहित, पर्यावरण संरक्षण आणि अध्यात्मिक मूल्ये जपण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर दत्त मंदिर जुनोनी ट्रस्टने एक महत्त्वपूर्ण संकल्प जाहीर करत यापुढे प्रत्येक गुरुवारी मंदिर परिसरात नियमित अन्नदान व वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. या उपक्रमात सर्व दत्तभक्त, भाविक, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले.

एक भक्त - एक वृक्ष, एक गुरुवार - अन्नदानासाठी समर्पित हा संकल्प स्वीकारून समाजसेवा, पर्यावरण संवर्धन आणि अध्यात्मिक कार्य अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे पदाधिकारी, सदस्य, ग्रामस्थ व स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार


## चर्चेतून प्रश्नाची सोडवणुक होते

सध्याला केंद्राचे पावसाळी अधिवेशन चालू आहे. वादळी ठरत असलेल्या या अधिवेशनात विरोधक आक्रमक होताना दिसून येत आहेत. वास्तविक दिल्लीत घडलेल्या प्रकाराची शांततेत चर्चा अपेक्षित असताना गोंधळ घालुन कामकाज तहकुब होत आहे हे सर्वात दुर्दैवी बाब आहे. कारण चर्चेशिवाय मार्ग निघणार नाही. गोंधळ घातला गेला तर चर्चा होणार नाही. दिल्लीत ज्या घडामोडी झाल्या. वांगचुक व दिपके यांनी पुकारलेल्या आंदोलनात विद्यार्थ्यांचा समावेश होतो का अन्य व्यक्तीचा याचा शोध घेतला पाहिजे. त्याच प्रमाणे देशाच्या राजधानीत अनेक राज्यातून मुले दिल्लीत जमली होती. पेपरफुटी प्रकरणी चौकशी व तोडगा निघावा हा विषय आंदोलनकर्त्याचा होता. असे जरी असले तरी प्रत्यक्षात मात्र आंदोलन चिघळले. जंतरमंतर आंदोलन अपेक्षित असताना लोकसभेच्या दिशेने आंदोलनकर्ते निघाले हे योग्य नव्हते. त्याच प्रमाणे आंदोलन लोकशाहीत होणे अपेक्षित आहे. त्याचे स्वरुप अहिंसेचे असले पाहिजे. यात विपरित घडले असल्याने पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. याची चौकशी झाली पाहिजे. विद्यार्थ्यांना कारण नसताना त्रास दिला तर चौकशी होणे क्रमप्राप्त आहे. असे असले तरी आंदोलनात खरेच आंदोलनकरी विद्यार्थी होते का? अन्य कोणाचा समावेश होता. या आंदोलनात रसद पुरविणारे कोण होते याची चौकशी झाली पाहिजे. आंदोलने, मोर्चे अन्य लोकशाहीने दिलेला अधिकार आहे. त्याचा जर कोणी गैरवापर करीत असेल तर त्याचा बंदोबस्त झाला पाहिजे. आंदोलनाचे आलिकडील स्वरूप बिघडत आहे. आंदोलनाच्या आडून विपरीत स्वरूप देण्याचा कोणाचा डाव असेल तर तो हाणून पाडला पाहिजे. या प्रकाराची लोकसभेत चर्चा होणे अपेक्षित आहे. अशांततेत चर्चा होत नाही. विरोधक आक्रमक होताना दिसून येत आहेत. विरोधकांना या बाबत चर्चा नको असेल तर तसे सांगितले पाहिजे. त्यामुळे वेळ, जनतेचा पैसा वाया तरी जाणार नाही. वास्तविक विचार केला तर आंदोलन पुर्वनियोजित होते का? वांगचुक यांनी आंदोलनास सुरवात केली. आगामी पावसाळी लोकसभेचे अधिवेशन केंव्हा सुरु होणार या बाबत माहिती घेवुन आंदोलन सुरु केले का? त्याच प्रमाणे आंदोलन करणारे लोकसभेवर चाल करण्याची गरज नव्हती. अशा अनेक बाबी संशयास्पद आहेत. त्यामुळे या आंदोलनाची सखोल चौकशीची गरज आहे. आंदोलने किंवा मोर्चे झाली पाहिजेत यात कोणाचेही दुमत नाही. यात दुमत असू शकत नाही मात्र ते जर देशविरोधी असेल किंवा चुकीच्या पद्धतीने हातळलेले असेल तर ते देशातील नागरिकांनी खपवुन घेवु नये. चुकीचे समर्थनही करू नये. दिल्लीत जे घडले ते दिवसेंनदिवस अनेक बाबी उघड्या पडत आहेत. त्यांना अन्न पुरविऱ्याची चौकशी होणे अपेक्षित आहे. चुकीचे किंवा देशविरोधकास भोजन पुरविण्याचे काम झाले असेल किंवा परदेशातून पैसा या भोजनाचे बीलपेड करण्यात येत असेल तर ते अतिषय चुकीचे आहे. कांहीच्यामते या आंदोलनास परदेशातून मदत म्हणजे फंडींग मिळत असेल तर ते योग्य नाही. फंडींग बाबत आता देशात नवा कायदा होणार असल्याचे सांगण्यात येते तो झाला तर अनेक चुकीच्या बाबीला आळा बसेल. याला विरोधासाठी आंदोलनाचा आडोसा ठरणार असेल तर योग्य नाही. केंद्रातील सत्ता परिवर्तन झाल्यापासून देशात शांतता आहे. हे तरी मान्य केले पाहिजे. त्याच प्रमाणे देशात यापुर्वी कॉक्रोच पक्ष नव्हता आताच निघाला, वांगचुकची चुणूक पहिल्यांदाच दिसून आले. देशात यापुर्वी अनेक पक्षाचे अनेक परिचित मंडळी होती. देश स्वातंत्राच्या काळात अनेक विरोधीपक्षाच्या नेत्यांनी आंदोलनात सहभाग घेतला होता. आता ती मंडळी दिसून येत नाही. त्यांचे आंदोलन नाही, अनेक मंडळी परदेशातून येते व आंदोलन करते ही बाब विचार करायाला लावणारी आहे. यापुर्वी ही आंदोलने झाली मात्र नियोजनबद्ध आंदोलन दिल्लीत नुकतेच झाले, त्यामुळे या आंदोलनाची कसुन चौकशी होणे क्रमप्राप्त आहे. मुळात यात कोणाचा सहभाग होता. आर्थिकबाब मजबुत कशी होती त्यापेक्षा अचानक असा उद्‌भवला गेला या बाबी जनतेसमोर आल्या पाहिजेत.आंदोलन पेपरफुटी प्रकरणी होते. यात प्रमुख आंदोलनकर्त्याचा काय संबंध होता. ते विद्यार्थी होते का? सर्वाधिक चहाता वर्ग कसा बनला या बाबी समोर आल्या पाहिजेत. चांगला उद्देश असेल, राष्ट्रीय विचार असतील तर ठिक, नसता त्यांच्या विचारातून विपरीत काही देशविरोधी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्रात अचानक मुंबई हल्ला झालाच होता. देशात कधी काय घडेल. कोणत्या वेळी काय घडेल हे सांगता येत नाही. त्यामुळे सतर्कता ही महत्वाची आहे. देशात आज पर्यंत जे घडले हे बेसावध असतानाच घडले आहे. मुळात आपल्या देशात सतर्कता म्हणावी तशी बाळगली जात नाही. त्यामुळे दुध तोंडाला पोळला म्हणून ताक सुद्धा फुसून पिण्याची वेळ आली आहे. देशात दिल्लीच्या ठिकाणी एकीकडे आंदोलनाचे स्थळ व मोर्चा संसद भवनावर असे घडले आहे. आंदोलनातून उद्रेक होता कामा नये. जे घडले याचा जबाब शांततेने सत्ताधाऱ्यावकडून घेणे विरोधकांचे काम आहे. गोंधळ झाला तर पळवाटा मिळू शकते. सत्ताधाऱ्यांना शांततेत घेरणे आवश्यक आहे. विरोधक आक्रमक होत आहेत. सभागृहातून बाहेर पडत आहेत तहकुब होते हे योग्य वाटणारे नाही. वास्तविक सत्ताधाऱ्यांनी या बाबत सखोल चौकशी खास यंत्रणेद्वारे होणे क्रमप्राप्त आहे. यात जर सरकारने कसूर केली तर विपरीत घडू शकते, त्यामुळे सतर्कता ही महत्वाची आहे. अचानक ज्यावेळी घटना घडता किंवा घडविल्या जातात हे पुर्वनियोजित असू शकते. मुळात आंदोलनकर्त्या प्रमुखांची चांगली माहिती जसे जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे असतील तर जनता डोळे झाकून विश्वास ठेवते. नवीन परदेशातून येवून आंदोलनाची धुरा सांभाळत असेल तर कोणाच्याही मनात शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे जे दिल्लीत घडले याची विशेष चौकशी होवून ते जनतेसमोर सत्य आले पाहिजे. त्यासाठी लोकसभेचे काम पुर्ण वेळ व काळ चालले पाहिजे. चर्चेतूनच सविस्तर निवेदन जनतेला कळाले पाहिजे. कोणता उद्देश होता हे जनतेला समजले पाहिजे.

# डिजिटल नकाशांतून जलसमृद्धीकडे!!

## ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशांनी घडवले महाराष्ट्रातील जलनियोजनाचे नवे पर्व

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.०अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी अत्याधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (Geographic Information System - GIS) विकसित करून राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे यंत्रणेच्या वेबसाईटवर प्रथमच सर्वसामान्यांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन, भूजल पुनर्भरण, जलसंधारणाची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामस्तरावरील विकास नियोजनाला नवी गती मिळाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, लोकसहभाग आणि शाश्वत जलव्यवस्थापन यांच्या संगमातून जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने राज्याने उचललेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.**




पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे; परंतु त्या प्रत्येक थेंबाचे शास्त्रशुद्ध नियोजन हीच खरी जलसुरक्षेची गुरुकिल्ली आहे.

एखाद्या गावात नवी विहीर कोठे घ्यावी? पाणी कोणत्या दिशेने वाहते? डोंगराच्या उतारावर सलग समतल चर (Continuous Contour Trenches - CCT) नेमके कुठे घ्यावेत? शेततळे, सिमेंट नाला बांध (CNB), गॅबियन किंवा इतर जलसंधारणाची कामे कोणत्या ठिकाणी सर्वाधिक परिणामकारक ठरतील? एखाद्या भागात भूजल पुनर्भरणाची क्षमता किती आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पूर्वी अनेक दिवस क्षेत्र पाहणी, कागदी नकाशे, स्थानिक अनुभव आणि विविध विभागांकडील माहितीवर अवलंबून राहावे लागत असे.

आज मात्र ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. संगणकाच्या पडद्यावर किंवा मोबाईलच्या स्क्रीनवर एका क्लिकमध्ये संपूर्ण पाणलोट डोळ्यासमोर उभा राहतो. नदी–नाले, ओघोळ, जमिनीचा उतार, मातीचा प्रकार, गावांच्या सीमा, गट क्रमांक, भूजल पुनर्भरणाची क्षमता आणि जलसंधारणाच्या उपचारांची योग्य ठिकाणे यांची माहिती आता डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाली आहे. या परिवर्तनामागे आहे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (WDC:PMKSY 2.0) अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी उभारलेली आधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (GIS).

या उपक्रमाचे सर्वात मोठे यश केवळ ऋखड तंत्रज्ञानाचा वापर नव्हे, तर महाराष्ट्रातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट (Micro Watershed) नकाशे प्रथमच सर्वसामान्य नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देणे, ही या उपक्रमाची ऐतिहासिक कामगिरी आहे. शासनाच्या तांत्रिक दालनात मर्यादित असलेली माहिती आज प्रत्येक शेतकरी, ग्रामपंचायत, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकापर्यंत पोहोचली आहे. ही केवळ डिजिटल सेवा नाही; तर जलसंधारणाच्या ज्ञानाचे लोकशाहीकरण आहे.

**जलसंधारणासमोरील वाढती आव्हाने**

महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रदेश आहे. कोकणातील मुसळधार पाऊस, विदर्भातील उष्ण हवामान, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन व्यवस्था आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगा.. प्रत्येक भागाची जलस्थिती वेगळी आहे. परंतु या सर्व भागांना एकच समान आव्हान आहे, ते म्हणजे पावसाचे पाणी अधिकाधिक प्रमाणात जमिनीत मुरविणे आणि भविष्यासाठी साठवणे.

हवामान बदलामुळे पावसाचा कालावधी कमी होत आहे, तर अल्पावधीत अतिवृष्टीचे प्रमाण वाढत आहे. परिणामी मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते. त्याचबरोबर मृदा धूप वाढते, भूजल पातळी घटते आणि शेतीची उत्पादकता कमी होते. अशा परिस्थितीत प्रत्येक थेंबाचे नियोजन शास्त्रीय पद्धतीने करणे ही काळाची गरज बनली आहे.

यासाठी केवळ जलसंधारणाची कामे करणे पुरेसे नसते; तर योग्य ठिकाणी, योग्य प्रकारचा आणि योग्य प्रमाणात उपचार करणे आवश्यक असते. हे काम अंदाजावर नव्हे, तर अचूक माहितीच्या आधारेच शक्य होते.

**अंदाजावरून विज्ञानाकडे जलनियोजनातील डिजिटल झेप**

काही वर्षांपूर्वी पाणलोट विकासाचे नियोजन करताना प्रत्यक्ष क्षेत्र पाहणी, स्थानिक अनुभव आणि कागदी नकाशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत असे. प्रत्येक विभागाकडे वेगवेगळी माहिती असल्याने सर्व माहिती एकत्र करून सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report - DPR) तयार करण्यासाठी मोठा कालावधी लागत असे. काही ठिकाणी एकाच प्रकारची कामे पुन्हा प्रस्तावित होत, तर काही भाग आवश्यक उपचारांपासून वंचित राहत असे.

आज ऋखड प्रणालीमुळे हे चित्र बदलले आहे. उपग्रह प्रतिमा, डिजिटल एलिव्हेशन मॉडेल, ऋझड आधारित सर्वेक्षण, मृदेची माहिती, पर्जन्यमान, भू–आकृती, जलप्रवाह, भूजल आणि इतर विविध माहितीचे स्तर (Layers) एकत्र करून त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण केले जाते. परिणामी निर्णय प्रक्रियेला डेटा आणि विज्ञानाचा भक्कम आधार मिळाला आहे. याच कारणामुळे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक २.० मध्ये ऋखड ला ऊळसळींरश्र ईीरळप असे संबोधले जाते. कारण ही प्रणाली केवळ नकाशे तयार करत नाही; तर संपूर्ण पाणलोट विकासासाठी योग्य निर्णय घेण्यास मदत करते.

**महाराष्ट्राची डिजिटल जलसंपत्ती : ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे**

या संपूर्ण उपक्रमातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे (Micro Watershed Maps) तयार करून ते विनामूल्य सार्वजनिक वापरासाठी यंत्रणेच्या तडखछ– या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. ही केवळ आकड्यांची नोंद नाही; तर राज्याच्या नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाचा डिजिटल पाया आहे.

आज कोणताही नागरिक आपल्या गावाचा सूक्ष्म पाणलोट नकाशा https://mhvslna.org/ या संकेतस्थळावर पाहू शकतो, डाउनलोड करू शकतो आणि त्याची प्रिंटही घेऊ शकतो. पूर्वी केवळ तज्ज्ञ आणि शासकीय यंत्रणांपुरती मर्यादित असलेली माहिती आता लोकांच्या हातात आली आहे. यामुळे शासनाची माहिती अधिक पारदर्शक झाली आहे, तसेच नागरिकांच्या सहभागालाही नवी दिशा मिळाली आहे. पाणलोट विकास हा केवळ सरकारी कार्यक्रम न राहता, लोकसहभागातून उभा राहणारा विकासाचा पाया बनू लागला आहे.

# माशीमुळे लहान मुले आजारी,पाहा सँडफ्लायचं इन्फेक्शन होते कसे आणि लक्षणे कोणती, उपाय काय..

अलिकडेच गुजरातच्या काही भागांमध्ये सँड फ्लायने पीडित लहान मुलांच्या केसेस आढळून आल्या. हा व्हायरस १५ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना चावल्याने जास्त पसरतो.

माशीमुळे लहान मुलं आजारी, पाहा सँडफ्लायचं इन्फेक्शन होतं कसं आणि लक्षणं कोणती, उपाय काय..

माशीमुळे लहान मुलं आजारी, पाहा सँडफ्लायचं इन्फेक्शन होतं कसं आणि लक्षणं कोणती, उपाय काय..

पावसाळ्यात देशाच्या अनेक भागांमध्ये कीटकांमुळे होणाऱ्या आजारांचा धोका खूप वाढतो. यातील एक कीटक म्हणजे सँड फ्लाय म्हणजे वाळू माशी (Sandfly). हा डासापेक्षा लहान आकाराचा एक कीटक आहे. पण याने चावल्यानंतर होणारं इन्फेक्शन फार गंभीर ठरू शकतं. वाळू माशी सामान्यपणे ओलावा असलेल्या जागांवर आढळते. जसे की, नाल्या, झाडी, जनावरांचे गोठे, मातीतील भेगा आणि अस्वच्छ ठिकाणांवर ही माशी आढळते. जी सामान्यपणे सायंकाळी जास्त सक्रिय होते.

अलिकडेच गुजरातच्या काही भागांमध्ये सँड फ्लायने पीडित लहान मुलांच्या केसेस आढळून आल्या. हा व्हायरस १५ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना चावल्याने जास्त पसरतो.

'सँड फ्लाय' (Sand Fly) या कीटकाला मराठीत वाळू माशी असे म्हणतात. हा एक अतिशय लहान आणि रक्त शोषक कीटक आहे, ज्याच्या चावण्यामुळे मानवाला विविध प्रकारच्या आजारांची लागण होऊ शकते. हा एक सूक्ष्म, डासापेक्षा लहान कीटक आहे जो प्रामुख्याने अंधाऱ्या, दमट आणि मातीयुक्त ठिकाणी आढळतो. वाळू माशीच्या चावण्यामुळे चांदीपुरा विषाणू (Chandipura Virus), कालाजार (Visceral Leishmaniasis) आणि सँडफ्लाय फीवर यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. सँडफ्लाय आधी एखाद्या इन्फेक्शन झालेल्या व्यक्तीचं किंवा प्राण्याचं रक्त पिते आणि मग दुसऱ्या व्यक्तीला चावल्यावर इन्फेक्शन पसरतं. हा आजार सामान्य संपर्क, हात मिळवणे, सोबत बसणे किंवा जेवण केल्याने पसरत नाही.

**सँडफ्लायची लक्षणं**

सँड फ्लाय चावल्यानंतर आधी त्वचेवर लाल पुरळ, खाज, जळजळ किंवा हलकी सूज दिसू शकते. जर इन्फेक्शन विकसित झालं तर काही दिवस ताप, कमजोरी, वजन कमी होणे, भूक कमी लागणे, ॲनिमिया आणि लिव्हरवर सूज अशी लक्षणं दिसू शकतात.

काही रूग्णांच्या त्वचेवर बराच काळ न भरणारे घाव किंवा अल्सर होऊ शकतात. ज्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. सोबतच या माशीमुळे होणाऱ्या संसर्गामुळे लहान मुलांमध्ये तीव्र ताप, उलट्या, जुलाब, थंडी वाजणे आणि मेंदूवर परिणाम (एईएस) होण्यासारखी लक्षणे दिसतात.

**कसा कराल बचाव?**

कीटकनाशक फवारणी : घराच्या आजूबाजूला वेळोवेळी औषध फवारणी करणे.

स्वच्छता: परिसर कोरडा ठेवणे आणि जनावरांच्या गोठ्यांची स्वच्छता राखणे.

संरक्षण: झोपताना मच्छरदाणीचा वापर करणे आणि शरीराची त्वचा झाकणारे कपडे घालणे.

# जुने कर्ज माफ, अन् एका दिवसातच मिळणार नवे पीक कर्ज




निसर्गाचा लहरीपणा, सततच्या दुष्काळामुळं मराठवाड्यासह राज्यातील शेतकरी कायम आर्थिक संकटात असतो. या दुष्टचक्रातून बळीराजाला कायमचे बाहेर काढण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' राबवण्यास सुरुवात केली आहे. २५ जुलै रोजी या योजनेची पहिली यादी जाहीर झाली आहे. राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी या योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीबाबत सविस्तर सांगितले आहे. या योजनेत केवळ कर्जमाफीच नाही, तर शेतकऱ्याला तत्काळ पुन्हा उभे करण्याची मोठी ताकद आहे. पहिल्या टप्प्यातील यादीत मराठवाडा विभागातील जवळपास सहा लाखांहून अधिक शेतकरी पात्र झाले आहेत.

**योजनेची सर्वात जमेची बाजू : अवघ्या एका दिवसात नवीन कर्ज**

एरवी कोणतीही कर्जमाफी झाली, तरी नवीन पीक कर्ज मिळण्यासाठी बँकांचा 'कुलिंग ऑफ पिरियड' (Cooling-off Period) असतो. यासाठी बँका अनेक महिने किंवा चक्क एक वर्ष वाट पाहायला लावतात. पण या योजनेत शासनाने एक 'मास्टरस्ट्रोक' लगावला आहे. सहकार आयुक्तांनी सर्व बँकांना स्पष्ट निर्देश दिले आहेत, की या कर्जमाफीनंतर हा 'कुलिंग ऑफ पिरियड' फक्त एका दिवसाचा असेल. म्हणजेच शेतकऱ्याने आज 'आपले सरकार सेवा केंद्रात' जाऊन स्वतःचे आधार प्रमाणीकरण पूर्ण केले. त्याची कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झाली, की त्याला अवघ्या एका दिवसात नवीन पीक कर्ज मिळू शकेल. आगामी हंगामासाठी बी–बियाणे आणि खते घेण्यासाठी शेतकऱ्याला कोणाकडेही हात पसरावे लागणार नाहीत. ही या संपूर्ण योजनेची सर्वात मोठी आणि क्रांतीकारी जमेची बाजू आहे.

**पहिल्या टप्प्यात मराठवाड्याला सर्वाधिक लाभ**

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील तब्बल १६ लाख ९६ हजार (सुमारे १७ लाख) शेतकरी कर्जमुक्त होत आहेत. या माध्यमातून १३ हजार ६०० कोटी रुपयांची थेट कर्जमाफी दिली जात आहे. विशेष म्हणजे, या पहिल्या यादीत मराठवाड्याचा वाटा सर्वात मोठा आहे. जवळपास सहा लाख ३७ हजार ९३५ मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यात लाभ मिळणार आहे.

राज्यातील सर्वाधिक लाभार्थी असलेल्या राज्यातील पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये मराठवाड्यातील दोन जिल्ह्यांचा समावेश आहे. एकट्या जालना जिल्ह्यात एक लाख सात हजार ५०५, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये एक लाख पाच हजार १२८ शेतकऱ्यांना लाभ मिळत आहे. छत्रपती संभाजी नगर विभागातील परभणीमध्ये ७९ हजार ८५५, हिंगोलीमध्ये ४४ हजार २१३ पात्र लाभार्थी शेतकरी आहेत.

सहकार विभागाच्या लातूर विभागांतर्गत बीडमध्ये सर्वाधिक ९९ हजार ६३१, त्यापाठोपाठ नांदेड ९९ हजार ५४, लातूर ५४ हजार ६६३ आणि धाराशिवमध्ये ४७८८६ शेतकरी या योजनेतून पहिल्या टप्प्यात कर्जमुक्त होत असल्याचे लातूर विभागाच्या सहकारी संस्थांचे विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी सांगितले. यासह योजनेचा लाभ सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन देखील केले.

**शेतकऱ्यांनी आता नेमके काय करायचे आहे?**

नवीन पीक कर्जाचा मार्ग मोकळा करण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी खालील सोपी प्रक्रिया त्वरित पूर्ण करणे आवश्यक आहे:

१. सेवा केंद्रात जा : यादीत नाव आल्यास आपले आधार कार्ड घ्या आणि त्वरित जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्रात' (CSC) जा.

२. ग्रीस्टॅक आयडी: या प्रक्रियेसाठी 'ग्रीस्टॅक' (AgriStack) फार्मर आयडी असणे अनिवार्य आहे. तुमच्याकडे तो नसेल, तर केंद्रावरच तत्काळ काढून मिळेल.

३. रक्कम तपासा: स्क्रीनवर तुमची ३१ मार्च २०२६ पर्यंतची थकबाकीची मुद्दल दिसेल. ती अचूक असल्यास बायोमेट्रिक (अंगठ्याचा ठसा) देऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करा.


४. बेबाकी प्रमाणपत्र: प्रक्रिया पूर्ण होताच तुम्हाला बेबाकी प्रमाणपत्र (No Dues Certificate) मिळेल आणि नवीन कर्जाचा मार्ग खुला होईल.

**दोन लाखांवरील कर्जासाठी 'एकवेळ समझोता' (OTS)**

ज्या शेतकरी बांधवांचे कर्ज दोन लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांनाही वाऱ्यावर सोडलेले नाही. त्यांच्यासाठी 'एकवेळ समझोता' योजना आहे. रिझर्व्ह बँकेच्या (RBI) धोरणानुसार, तुमचे खाते 'एनपीए' (NPA) झाल्यानंतरचे सर्व व्याज माफ केले जाईल. तसेच मुदलातही मोठी सवलत मिळेल. सवलतीनंतर उरलेली दोन लाखांवरची रक्कम तुम्ही भरल्यास, शासनाकडून तुमचे दोन लाख रुपये माफ केले जातील.

थोडक्यात सांगायचं तर

ही केवळ एक कर्जमाफी नाही. शेतकऱ्याला पुन्हा आत्मसन्मानाने उभे करण्याची एक सुसज्ज यंत्रणा आहे. जुने कर्ज माफ आणि लगेच दुसऱ्या दिवशी नवीन कर्ज, हा निर्णय कृषी क्षेत्रासाठी संजीवनी ठरणार आहे. त्यामुळे सर्व पात्र शेतकरी बांधवांनी अजिबात वेळ न दवडता त्वरित आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. विकासाच्या या नव्या प्रवाहात सामील व्हावे !



**– डॉ. श्याम टरके**
सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, लातूर

# अब्जाधीशांची आबादी!

...जे अधिक श्रीमंत तेच अधिकाधिक श्रीमंत होणे एक वेळ ठीक; पण असे होत असताना जे गरीब ते अधिकाधिक गरीब होत जातात, बेरोजगारी वाढतच राहते आणि जवळपास ८२ कोटी जणांस मोफत शिधा देण्याचे औदार्य सरकारला दाखवावे लागते...

देशाच्या आर्थिक उतरंडीतील शिखरावरच्या दहा टक्क्यांचा राष्ट्रीय उत्पादनातील वाटा ५८ टक्के; त्याहीपैकी अगदी वरच्या एक टक्क्यांचा ४० टक्के!

खरे तर ही बातमी समस्त भारतवर्षाने साजरी करावयास हवी. सत्ताधार्यांनी हत्तीवरून साखर वाटावयास हवी आणि वर्तमानपत्रे, वृत्तवाहिन्यांवर सरकारी जाहिरातींचा उत्सव साजरा व्हायला हवा. ही माहितीच तशी आहे. ती सरकारच्या वतीने थेट संसदेत सादर केलेली असल्याने तिच्या सत्यतेविषयी दुष्ट माध्यमकर्मीसही संशय घेता येणार नाही आणि त्याविषयी भाष्य केल्याबद्दल राष्ट्रद्रोहाचा आरोपही त्यांच्यावर करता येणार नाही. ही माहिती अत्यंत महत्त्वाच्या अर्थ खात्याचे राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी सादर केली. खरे तर विद्वान अर्थपंडिता निर्मला सीतारामन यांनी ती देणे प्रशस्त ठरले असते. 'रुपया अशक्त झालेला नाही; तर त्या तुलनेत डॉलर अधिक सशक्त झा-लेला आहे', हे काळाच्या विशालपटावर सुवर्णाक्षरात कोरले जाईल असे विधान आणि अर्थव्यवस्थेचे निदान त्यांचेच. त्यामुळे त्याच रुपयाच्या जोरावर देशातील वाढत्या अब्जाधीशांची माहिती त्यांनी देणे रुपयाच्या अशक्तपणावरील उतारा ठरले असते. परंतु ते करण्याची संधी त्यांनी आपल्या खात्याच्या राज्यमंत्र्यांस दिली. याचे दोन अर्थ निघतील. एक म्हणजे अर्थमंत्र्यांचे औदार्य आणि दुसरा मुद्दा म्हणजे या माहितीत मिरवावे असे काही नसणे. यातील कोणता मथितार्थ येथे लागू पडतो, हे तपासण्याआधी अर्थराज्यमंत्र्यांनी नेमकी माहिती दिली कसली हे लक्षात घ्यावे लागेल. ही माहिती आपल्या भारतवर्षात वार्याच्या वेगाने वाढणार्या अब्जाधीशांच्या संख्येविषयी आहे. रुपया तितक्याच वेगाने जरत्कारू होत असताना त्याच रुपयांत मोजल्या जाणार्या संपत्तीत अशी आणि इतकी वाढ होणे हे खास खरेच. गणितात अनुत्तीर्ण होत असतानाही एखाद्या विद्यार्थ्याच्या सरासरी गुणांची टक्केवारी वाढणे हे जितके कौतुकाचे तितकेच रुपया मजबूत होत नसताना, खरे तर अशक्त होत असताना, रुपयांतील अब्जाधीशांची वाढ होणे अभिमानास्पद. तेव्हा या देदीप्यमान कामगिरीसाठी संबंधितांचे आभार मानून अर्थराज्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीचा परामर्श घेणे बरे. या माहितीनुसार आपल्या मायदेशातील अब्जाधीशांची संख्या या अर्थवर्षात ५०० चा टप्पा ओलांडून पुढे गेली. अवघ्या चार-पाच वर्षांपूर्वी २०२१-२२ या अर्थवर्षात ही संख्या जेमतेम १४२ इतकीच होती. ते वर्ष करोनोत्तर. त्या अज्ञात विकाराने आपल्यातील अनेकांच्या आरोग्याचा जसा र्हास केला तसेच आपल्या अर्थव्यवस्थेसही अभयमुद्रावस्थेत बसवले. पण आपले कौतुक असे की त्याही वर्षी आपल्या देशात १४२ इतके अब्जाधीश होते. पण नंतरच्या चार वर्षांत अर्थव्यवस्थेच्या वाढीचा झपाटा असा की यंदाच्या वर्षात त्यात जवळपास चार पट, म्हणजे ४०० टक्के, इतकी वाढ होऊन अब्जाधीशांची संख्या ५७६ इतकी झाली. ज्यांची वैयक्तिक कमाई किमान १०० कोटी रुपये आहे त्यांची यात गणना होते. म्हणजे वर्षभरात १०० कोटी वा अधिक इतकी कमाई करणारे आपल्या देशात आता ५७६ इतके आहेत. ही कौतुकाची बाब नव्हे काय? दुसर्या बाजूने ८२ कोटी जणांस महिन्याचा किराणा मोफत देण्याचे औदार्य आपले सरकार दाखवत असताना पहिल्या बाजूला वर्षास इतक्या झपाट्याने अब्जाधीशांची संख्याही वाढत असेल ती बाब केवळ अर्थपंडितांसच नव्हे तर जनसामान्यांसही अचंबित करणारी ठरते. हे अचंबित होणे आणखी एका कारणासाठी वैशिष्ट्यपूर्ण म्हणावे लागेल. हे वैशिष्ट्य म्हणजे भारताचे जागतिक अर्थ क्रमवारीतील स्थान. त्या स्थानात अद्यापही लक्षणीय बदल झालेला नाही. आपण अल्प-उत्पन्न गटातील देशांपेक्षा काहीसे वर आहोत, पण श्रीमंत वा आर्थिक दृष्टीने सुस्थित देशांच्या जवळपासही नाही. तरीही आपल्या देशातील फक्त अब्जाधीशांची संख्या वाढत असेल तर ती बाब सर्वार्थाने सूचक म्हणायला हवी.त्याचमुळे जगातील सर्वात विषम देशांत भारताची गणना होते. विविध आर्थिक सर्वेक्षणांनी आतापर्यंत हा मुद्दा अनेकदा दाखवून दिलेला आहे. यंदाच्या 'जागतिक असमानता अहवाला'नुसार (वर्ल्ड इनइक्वॅलिटी रिपोर्ट) या आर्थिक विषमतेत गेल्या काही वर्षांत तसूभरही फरक पडलेला नाही. पॅरिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेच्या वतीने हा अहवाल तयार केला जातो आणि त्याच्या रचनेत अनेक अर्थतज्ज्ञांचा समावेश असतो. त्यामुळे त्याच्या विश्वासार्हतेबाबत मतभेद नाहीत. या पाहणीनुसार आर्थिक उतरंडीत जे वरच्या १० टक्क्यांत मोडतात त्यांच्या खिशात आपल्या राष्ट्रीय उत्पादनातील जवळपास ५८ टक्के जमा होतो. याचाच दुसरा अर्थ असा की राहिलेली ९० टक्के जनता ४२ टक्के उत्पन्नात आपापला संसार चालवते. यातही पुन्हा विभागणी अशी की या १० टक्क्यांतही जे वरचे एक टक्का, म्हणजे काही महत्त्वाचे 'अ'द्योगपती वगैरे, आहेत त्यांच्याच हाती या श्रीमंतांतील ४० टक्के श्रीमंती आहे. म्हणजे उर्वरित नऊ टक्के हे श्रीमंतांतील दारिद्र्यरेषेखालचे. थोडक्यात असे की आपल्याकडे जे श्रीमंत आहेत ते अधिक श्रीमंत होतात, जे अधिक श्रीमंत आहेत ते अधिकाधिक श्रीमंत होतात आणि फार थोडे 'अ'द्योगपती हे सर्वात श्रीमंत होतात. त्यांनी तसे व्हावेही. कोणास त्यात अडचण असण्याचे कारण नाही. पण हे निवडक श्रीमंतांचे अतिश्रीमंतांत रूपांतर होत असताना गरिबांचे रूपांतर अधिक गरिबांत होते हा यातील आक्षेप.

सर्वसाधारणपणे देशाच्या संपत्ती निर्मितीत असे मानले जाते की 'वरच्यांकडील' समृद्धीचा प्रवाह खाली झिरपतो. आपल्याकडे तसे होताना दिसत नाही. सगळे काही वरच्या वर. त्यामुळे देशात बेरोजगारीत मोठी वाढ होत असताना त्याच वेळी अब्जाधीशांची संख्याही चार पटीने वाढताना दिसते. आता यावर काही मान्यवर विद्यमान युद्धस्थिती वा त्याआधीचे करोना संकट यांस आपल्या कुंठितावस्थेसाठी जबाबदार धरतील.

पण ही आत्मवंचना ठरेल. आपले विद्यमान अर्थस्खलन इराण युद्धास तोंड फुटण्याच्या आधीपासून सुरू आहे आणि २०२० साली करोनाने ग्रासले जाण्याआधीच आ-पली आर्थिक दुरावस्था सुरू झाली होती. या दोन्ही कारणांनी विपन्नावस्थेस गती दिली इतकेच. हे 'लोकसत्ता'ने वारंवार दाखवून दिलेले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील धोके २०२५-२६ हे आर्थिक वर्ष सुरू झाल्यापासून परदेशी गुंतवणूकदारांनी वेळीच ओळखले. त्याचमुळे यंदाच्या ३१ मार्चला संपलेल्या आर्थिक वर्षात परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी तब्बल १.८१ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली. यंदाच्या आर्थिक वर्षातील पहिल्या दोन महिन्यांतच ८४ हजार २८२ कोटी रु. आपल्या बाजारातून गेले आहेत. आता त्या गुंतवणुकीचा ओघ पुन्हा सुरू झाल्याचे दावे सत्ताधीशांकडून केले जा-तात खरे. पण या दाव्यांस पुष्टी मिळेल अशी आकडेवारी तरी तूर्त उपलब्ध नाही. तीच बाब २०२० साली करोनाघाताबाबत. या विषाणूने समस्तांस ग्रासण्याआधीच चार वर्षे २०१६ पासून आपल्या अर्थव्यवस्थेची घसरगुंडी सुरू झाली होती. सगळे काही बरे चालले आहे असे वाटत असताना २०१६ सालचा निश्चलनीकरणाचा तो दिव्य निर्णय आणि त्यातून देश पुरता सावरला जायच्या आतच वर्षभरात आलेला अपंग वस्तू-सेवा कर. म्हणजे जीएसटी. त्या करव्यवस्थेतील अपंगत्व दूर करण्याचे प्रयत्न आज दहा वर्षे होत आली तरी सुरू आहेत. पण ते व्यंग काही अजून आपण दूर करू शकलेलो नाही. सूक्ष्म/लघु मध्यम उद्योगांचे उद्योजक, लहानमोठे व्यापारी यांस या कराचा मोठा फटका बसला. त्यातील अनेक रसा-तळास गेले.तेव्हा अनेकांबाबत हे किंवा असेच वास्तव असताना त्याच वेळी अब्जाधीशांची संख्या मात्र वाढताना दिसते, यातूनच आपली विषमता अधोरेखित होते. याची कल्पना अर्थातच अर्थमंत्र्यांस असणार. त्याचमुळे हे 'यश' मिरवणे त्यांनी टाळले असावे. ही अब्जाधीशांची आबादी तितकी सुखावणारी नाही.

## मुलं न होणे, पाप नाही!

माझ्या बायकोच्या गरोदरपणात अगदी दोन्ही-वेळी गायनाकॉलॉजिस्टकडे जाण्याचा योग आला होता. त्यामुळे दरमहिन्यातून एकदा का होईना दवाखान्याची फेरी ठरलेली होती. दवाखान्यात आमच्यासारखी बरीच जोडपी होती. काही नेमकी लग्न झालेली, तर काही लग्नाला २०-२० वर्षे झालेली पण होती. आमच्यापेक्षा २० वर्षांनी मोठी जोडपी पाहून त्यांची चौकशी करावी, असे सहज मनात आले. त्यांच्याशी हितगूज साधल्यावर बरीच धक्कादायक माहिती समोर आली; जी मी आपल्यासोबत नक्कीच लिखानातून सांगेल. जोडपी बोलत होती. २० वर्ष लग्नाला झालीत; अजून मुलं-बाळं नाही. घरच्यांसोबत शेजारीही बोलून दाखवत आहेत. बोलून दाखवत आहेत म्हणजे, मवांझ बाई कुठली!फ्फ, मनामर्द!फ, माणसात नाही तो!, नावालाच बाई आहे ती!., काय करतील एवढी इस्टेट?, कर्माची फळं. वैगरे. इतक्या खालच्या स्तरावरील ते बोलणे होते. ऐकताना अंगावर काटे येत होते. जणू हे वार आपल्यावरच होत असावेत. ती टोचून बोलणारी लोकं दिसत नसली तरी राक्षसी वृत्तीची असावीत, इतका किळसवाणा चे-हरा डोळ्यासमोर येत होता. मी ज्या जोडप्याला बोललो त्यांचे वय जरी ४५-५० असले तरी, ते सारख्या चिंतेने साठीचे दिसत होते. कंटाळलेपणाचा भाव स्पष्ट जाणवत होता. जगण्याची उमेद दिसावी असे काहीच नव्हते. अखखा महाराष्ट्र आणि शेजारील राज्य पण त्यांनी पिंजून काढले. पण, मुलं-बाळं झाले नाही. मला तर जास्त वाईट याचे वाटले की, लोकांनी त्यांना सारखे तिटकारु नये म्हणून मुलं हवे होते. घरची परिस्थिती उत्तम, सर्व काही सोयीने समृद्ध तरीसुद्धा रोजदारला नसेल एवढी चिंता त्यांच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या वाढवीत होती. मला नेहमी हा प्रश्न पडतो, की लोकांना स्वतःचे काम कमी आणि इतरांच्या उखळ्यापाखळ्या काढण्यातच जास्त रस का आहे? स्वतःच्या परिवाराचे तीन-तेरा वाजून जिंदगी शेवटाला येईल पण दुसऱ्याचे खड्डे दाखवण्यात का मजा वाटावी? मजा वाटावी अन घ्यावी असे खूप क्षेत्र असताना, दुसऱ्यांच्या खाजगी आयुष्यात डोकावणे इतके जरुरी का? एखादा व्यक्ती आजारी पडतो, एखादयाला ह्रदयरोग होतो, तसे कोणाला मुलं-बाळं होत नाही. मग, तो काही गुन्हेगार समजायचा का? शरीरातील एखादी कमतरता म्हणजे पूर्ण माणूसच निकामी असा अर्थ होत नाही. ह्रदयात दोष, यकृत-किडनीत दोष जसा, तसा हा भाग. उलट लेकरू होण्या न होण्याने शरीरावर कुठलाही विपरीत परिणाम होत नाही. लोकांची इपरीत बुद्धीच असते जी कीड लागावी तशी मोठमोठ्या माणसांना चिंता देऊन खाऊन टाकते. पुरुषांपेक्षा स्त्रियांना या गोष्टींचा त्रास खूप जास्त होतो. मुलं नाही, मद्या मग सोडून हिलाफ, कुठल्या कार्यक्रमात बोलवायचे नाही; वांझोटी म्हणून लेकराला हात लावू द्यायचा नाही. चुकून किंवा नाईलाजाने एखाद्या कार्यक्रमाला बोलावलेच तर अत्यन्त अपमानास्पद वागणूक द्यायची. सासू ज्यांना सूना आई म्हणून हाक मारतात, तिच्या तर भात्यात हीचा पाता कायम बसलेला असतो. वेळ मिळेल तेव्हा बाणाचे सरळ काळजावर खोलवर वार करत असते. आधीच काय कमी वार झाले होते; जे अजून भरले नाहीत, त्यात रोज नव्या जखमा देण्यात कसली अघोरी शांतता मिळत असेल? दोन मुलं पदरी असणाऱ्या स्त्रियांना तर खूपच नाक असते. जणू यांनी शौर्यपदक मिळविले इतके. तुम्ही तुमचे शौर्य गाजवा,खूप गाजवा! पण दुसरा कमजोर सांगून मी मोठा म्हणण्यात शहाणपणा नाही.

पुरुषही या यातना भोगतात. निदान ते बायकोत दोष काढून सांभाळून तरी घेवू शकतात. पण, बायकांना असे करता येत नाही. कमजोरी आहे, म्हणजे इलाज आहे. इलाज नाही झाला तर नाईलाज आहे. मग त्याने काय जीवन सम्पते का? नाही सम्पत! जीवन हे नकारार्थी विचार केल्याने सम्पते; जीवन लोकांचे घाण विचार डोक्यात घुसू दिल्याने सम्पते; आणि त्या विचारांना पाळल्याने तर उद्ध्वस्तच होते.





## मेंदूच्या आजारांबाबत आपण पुरेसे सजग असतो का?


६० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ८.८ दशलक्षाहून अधिक लोकांना स्मृतिभ्रंश आहे. हा आकडा २०५० सालापर्यंत ११.४ दशलक्ष होण्याचा अंदाज आहे. तसेच ६० ते ८० लाख लोक अपस्माराने त्रस्त आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे मेंदूच्या ट्युमरच्या रुग्णांमध्येही वाढ होत निरोगी मन आणि सुदृढ मेंदूसाठी जीवनशैलीत बदल तसेच वेळेवर वैद्यकीय सल्ला घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. अलीकडेच जागतिक मेंदू दिवस साजरा केला गेला. त्याची या वर्षाची संकल्पना आहे- ब्रेन हेल्थ: क्सेस फॉर ऑल अर्थात 'मेंदूचे आरोग्य जगातील सर्वांना, सगळीकडे उपलब्ध व्हायला हवे'. विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रामध्ये प्रगती होऊन शास्त्रज्ञांनी मेंदूविषयी बरेच संशोधन केले आहे. तरीदेखील जगभरातील अब्जावधी लोकांना अजूनही मेंदूची अत्यावश्यक औषधे सहज उपलब्ध होत ना-हीत. याची पार्श्वभूमी अशी आहे की, जगभरामध्ये ३.४ अब्जाहून अधिक लोक मेंदूच्या आजारांनी त्रस्त आहेत. मेंदू व मज्जासंस्थेचे उपचार कित्येक देशात, प्रदेशात, समूहांमध्ये असमान पध्दतीने उपलब्ध आहेत. त्यामुळे अनेक लोकांना मेंदूच्या आजारावरची महाग औषधे परवडत नाहीत, अनेकदा प्रशिक्षित तज्ञांचा अभाव असतो, डॉक्टरांना भेटण्यासाठी खूप वेळ थांबायला लागते, अनेकांना मेंदूचा आजार हा कलंक वाटतो आणि अनेक ठिकाणी मर्यादित प्रमाणात वैद्यकीय सेवा उपलब्ध असतात.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




खरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉ. संजय देशपांडे, कन्सल्टंट सेक्सॉलॉजिस्टखरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. **(क्रमश. )**

## २ Joke — विनोद




**गुरूजी** : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?
**शिष्य** : असत्यवादी.
**गुरूजी** : काहीतरी भलतंच कसं काय?
**शिष्य** : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.

## ३ Message — संदेश



Babu apni girlfriend se- darling kal ghar par aa jana koi bhi nahi hoga!
Jab ladki ghar par aati hai to sachmuch koi nahi tha.
Ladka- kya me tumhara hath tham lu?
Ladki – No thanks ! ye itna bhari nahi he!!

## ४ Thought — सुविचार




जागृतावस्थेतील व्याधींना निद्रा हेच एकमेव औषध.
-सर्वेटिस

**संस्कृत सुभाषित**

**जीवन्तोऽपि मृताः पञ्च व्यासेन परिकीर्तिताः ।**
**दरिद्रो, व्याधितो, मूर्खः, प्रवासी नित्यसेवकः ॥**

अर्थ : दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. मारुती
५. लाकडाची (वस्तू)
८. राग
११. जास्तीत जास्त व कमीत कमी
१३. रणांगण
१४. द्राक्षाचा, केळ्यांचा घोस
१५. पातळ खांब
१६. बातमीदार
१७. पुन्हा
१८. संगीतसम्राट
२१. रेती
२३. हिंदीत माळ
२४. प्रख्यात, प्रसिद्ध
२६. कीर्तनकार, ह.भ.प.चे विस्तृत रुप
२८. मांडणी
२९. राजाची पत्नी
३०. विधवेशी लग्न
३२. धुंदी
३३. सापाने टाकलेली त्वचा
३४. पवित्र
३६. कमळ
३७. झोपडी
३८. वर-वधुमधील पडदा
३९. घागरा
४१. धार्मिक गट
४२. आकाश
४४. पिता
४५. फळांचे पेय
४६. रद्द
४७. जन्म-मृत्यू
४९. आणि
५०. नशा आणणारा, कैफी
५२. लोणच्यातील द्रव मसाला
५४. गर्दभ
५५. गवंड्याकडील सिमेंट थापण्याचे साधन
५६. फुलांची माळ
५७. एकापेक्षा दुसरा वरचढ
५९. हुक्की, लहर
६०. चौथा हिस्सा
६१. खटला, हक्क सांगणे
६२. एकावर एक रचलेले
६४. नाव हाकणारा
६५. विमानाची धावपट्टी (इंग्रजी)
६६. जाळण्यायोग्य
६७. धमनी

### उभे शब्द

२. तोटा
३. आईचा भाऊ
४. -- दमयंती
५. तिबेटी धर्मगुरु
६. दयाळू
७. युद्ध
८. साथसोबत
९. तणाव
१०. अवघड, कष्टप्रद
१२. चावी
१३. पत्नी
१४. राहण्याची जागा
१५. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
१७. पळून जाणे
१९. सेनापती
२०. वाकण्याची क्रिया
२१. वायू, वारा
२२. रक्त सांडणे
२३. भडीमार
२५. नमस्कार
२६. विश्वासघातकी
२७. गुणाकार
३१. सरसकट
३३. खर्चात कपात
३४. वार्ता, समाचार
३५. बाळभाषते पाणी
३६. प्रधानमंत्री
४०. तीव्र ऊन
४३. जाणकार
४३अ. नम्र, वाकलेला
४४. ढग (सं), भरभर
४५. अखेरीस
४७. लोकसंख्येची मोजणी
४८. यजमान
५०. मावशीचा मुलगा
५१. गोष्टी सांगणे
५२. संसद सदस्य
५३. रसपूर्ण
५८. उग्र वासाची एक पालेभाजी
६३. फळातील द्रव

### आडवे उत्तरे

१.हनुमान ५.लाकडी ८.संताप ११.कमालकिमान १३.समरांगण १५.वासा १६.वार्ताहर १७.परत १८.तानसेन २१.वाळू २३.माला २४.नामवंत २६.हरिभक्तपरायण २८.रचना २९.राणी ३०.पाट ३२.नशा ३३.कात ३५.पाक ३६.पंकज ३७.खोपट ३८.अंतरपाट ३९.परकर ४१.संप्रदाय ४२.आसमान ४४.जनक ४५.सरबत ४६.रहित ४७.जननमरण ५०.मादक ५२.खार ५४.गाढव ५५.थापी ५६.गजरा ५७.शेरास सवाशेर ५९.सणक ६०.पाव ६१.दावा ६२.थर ६४.नाखवा ६५.रनवे ६६.जळाऊ ६७.नस

### उभे उत्तरे

१.नुकसान ३.मामा ४.नल ५.लामा ६.कनवाळू ७.समर ८.संगत ९.ताण १०.खडतर १२.किल्ली १३.सहचारिणी १४.घर १५.वातावरण १७.पलायन १९.सेनानायक २०.नम २१.वात २२.रक्तपात २३.मारा २५.वंदन २६.हरमाखोर २७.पट ३१.सकटनिकट ३३.काटकसर ३४.बातमी ३५.पापा ३६.पंतप्रधान ४०.रणरण ४३.माहितगार ४३अ.नत ४४.जलद ४५.सरतेशेवटी ४७.जनगणना ४८.नवरा ५०.मावसभाऊ ५१.कथाकथन ५२.खासदार ५३.रसवान ५८.शेपू ६३.रस



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### ऑस्ट्रेलियाची मागणी ठरणार गेम चेंजर, जय शाह मान्य करणार का?

**मुंबई**–२०२७ च्या वनडे वर्ल्ड कपला अजून एक वर्षापेक्षा जास्तचा काळ शिल्लक आहे, पण प्रत्येक टीमची तयारी आतापासूनच सुरू झाली आहे. ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२७ मध्ये दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबियामध्ये वनडे वर्ल्ड कप होणार आहे, पण या वर्ल्ड कपच्या आधीच ऑस्ट्रेलियाने आयसीसीकडे वनडे वर्ल्ड कपचा एक नियम बदलण्याची मागणी केली आहे. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी ही मागणी केली तर वनडे वर्ल्ड कप गेम चेंजर ठरू शकतो.
आयसीसीच्या नियमांनुसार कोणत्याही आयसीसी स्पर्धामध्ये तुम्ही १५ खेळाडूच निवडू शकता, पण ऑस्ट्रेलियाचे हेड कोच ऍन्ड्र्यू मॅकडोनाल्ड यांनी खेळाडूंची संख्या १७ करण्याच मागणी केली आहे. जर ही क्रिकेटची सगळ्यात मोठी स्पर्धा असेल, तर टीममध्ये किती खेळाडू असले पाहिजेत? मागच्या वर्ल्ड कपमध्ये आम्हाला १५ खेळाडू निवडताना अनेक अडचणी आल्या, न्यूझीलंडची परिस्थितीही तशीच होती. अनेक खेळाडूंना दुखापत झाली होती. स्पर्धेच्या सुरूवातीला १२–१३ खेळाडूच खेळवू शकतो, कारण दुसऱ्या खेळाडूंना पुढे खेळवता येईल. तुम्हाला पाहिजे ती टीम खेळवता येत नाही, असे ऍन्ड्र्यू मॅकडोनाल्ड म्हणाले.

### भारतीय पुरुष हॉकी संघाची घोषणा, हरमनप्रीत सिंगकडे नेतृत्व

नवी दिल्ली–हॉकी इंडियाने जपानमधील ऐची–नागोया येथे १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या २०व्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ साठी २० सदस्यीय भारतीय पुरुष हॉकी संघाची घोषणा केली. स्टार डिफेंडर आणि ड्रॅग–फ्लिक विशेषज्ञ हरमनप्रीत सिंग संघाचे कर्णधारपद भूष–वणार असून, अनुभवी मिडफिल्डर मनप्रीत सिंग उपकर्णधार असेल. भारत गतविजेता आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार आहे. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२३ च्या हांगझू आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून पॅरिस ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळवले होते. यावेळी, विजेतेपद कायम राखणे आणि लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकसाठी थेट प्रवेश मिळवणे हे संघाचे ध्येय असेल. मोहित एचएस आणि सूरज करकेरा गोलरक्षणाची जबाबदारी सांभाळतील. बचावफळीत जरमनप्रीत सिंग, हरमनप्रीत सिंग, अमित रोहिदास, जुगराज सिंग, संजय, सुमित आणि यशदीप सिवाच यांचा समावेश आहे. राजिंदर सिंग, राज कुमार पाल, हार्दिक सिंग, मनप्रीत सिंग, नीलाकांत शर्मा आणि विवेक सागर प्रसाद हे मि डफिल्डमध्ये संघाचे नेतृत्व करतील. दिलप्रीत सिंग, शिलानंद लाक्रा, सुखजीत सिंग, मनदीप सिंग आणि अभिषेक हे आक्रमणाचे नेतृत्व करतील.

### स्टार फुटबॉलपटू नेमारचा आंतरराष्ट्रीय फुटबॉलला रामराम

नवी दिल्ली–ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू नेमार ज्युनियरने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. तो आता ब्राझीलकडून खेळणार नाही. या ३४ वर्षीय फुटबॉलपटूने आपल्या संघासाठी सातत्याने चांगली कामगिरी केली. पण त्याला विश्वचषक जिंकण्यात अपयश आले. निवृत्तीची घोषणा केल्यानंतर तो आता भावूक झाला आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या फिफा विश्वचषक २०२६ मध्ये ब्राझीलच्या संघाने चांगली कामगिरी केली नाही. स्पर्धेसाठी एक प्रबळ दावेदार मानला जाणारा हा संघ अव्वल चारमध्ये स्थान मिळवू शकला नाही. स्पर्धेदरम्यान नेमारला दुखापतीचाही सामना करावा लागला, ज्यामुळे तो बराच काळ बेंचवर बसून होता. त्याने आता आंतरराष्ट्रीय फ ुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली आहे, पण तो क्लबसाठी खेळणे सुरू ठेवेल.नेमारने स्पष्टपणे सांगितले, मफ्राष्ट्रीय संघासोबतचा माझा काळ संपला आहे. मी पिवळ्या जर्सीसाठी घाम गाळला, इतिहास घडवला आणि नेहमीच माझ्या देशासाठी लढलो. मला आता खेळायचे नाही.फ्फ नेमार हा ब्राझीलचा आतापर्यंतचा सर्वाधिक गोल करणारा फ ुटबॉलपटू आहे. त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक अविस्मरणीय क्षण निर्माण केले.

### हरजिंदर कौर यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून अभिनंदन

नवी दिल्ली–ग्लासगो येथे आयोजित राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा २०२६ मध्ये भारोत्तोलनात, महिलांच्या ६९ किलो वजनी गटात रौप्य पदक जिंकल्याबद्दल, हरजिंदर कौर यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केले आहे.हरजिंदर यांची ही कामगिरी त्यांची स्वत:ची आजवरची सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे हे नमूद करत पंतप्रधानांनी राष्ट्रकुल स्पर्धेत आपल्या भारोत्तोलकांची अशी उत्कृष्ट कामगिरी पाहून खूप आनंद झाल्याचे म्हटले आहे.
मोदी यांनी हरजिंदर कौर यांना भविष्यातील त्यांच्या पुढील प्रवासासाठी आणि प्रयत्नांसाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.पंतप्रधानांनी एक्स या समाजमाध्यमावर लिहिले आहे;मफ्लासगो येथे सुरु असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत, भारोत्त–ोलनात महिलांच्या ६९ किलो वजनी गटात रौप्य पदक जिंकल्याबद्दल हरजिंदर कौर यांचे खूप खूप अभिनंदन. कालची त्यांची ही कामगिरी आजवरची त्यांची सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी ठरली आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. या स्पर्धेत आपले

# एकाच स्पर्धेत दोन पदके! दिलीप गावितचे सुवर्णपदक

## मोहम्मद बासिलचे रौप्य; भारताच्या पॅरा धावपटूंनी कॉमनवेल्थमध्ये गाजवले मैदान

भारताला १०० मीटरच्या पॅरा ॲथलेटिक्सच्या धावण्याच्या स्पर्धेत दोन पदकं मिळाली आहेत. दिलीप गावित व बसिल यांनी सुवर्ण रौप्य पदक पटकावलं.

२०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भाराताच्या दिलीप म्हादू गावित आणि मोहम्मद बासिल यांनी पुरुषांच्या १०० मीटर टी४७ प्रकारात अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्यपदक जिंकत भारताला दुहेरी यश मिळवून दिलं. दिलीप गावितने शेवटच्या ३० मीटरमध्ये जबरदस्त वेग वाढवत १०.७१ सेकंदांत शर्यत पूर्ण केली आणि सुवर्णपदकावर नाव कोरलं. तर मोहम्मद बासिलने १०.८३ सेकंदांची वेळ नोंदवत रौप्यपदक पटकावलं.
पॅरा ॲथलेटिक्समध्ये भारताने राष्ट्रकुल स्पर्धेत दुसऱ्यांदा एका स्पर्धेत दोन पदकं जिंकण्याचा पराक्रम केला आहे. यापूर्वी महिलांच्या शॉटपुट एफ५७ प्रकारात शर्मिला धनकर आणि शिल्पा यांनी अनुक्रमे सुवर्ण आणि कांस्यपदक जिंकत भारताला दुहेरी यश मिळवून दिलं होतं. महाराष्ट्रातील नाशिकचा २३ वर्षीय दिलीप म्हादू गावित हा २०२२ च्या आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता आहे. त्याने



त्यावेळी पुरुषांच्या ४०० मीटर टी४७ प्रकारात सुवर्णपदक जिंकून आपली छाप पाडली होती.
टी४७ हा पॅरा ॲथलेटिक्समधील असा प्रकार आहे, ज्यामध्ये खेळाडूंच्या एका हातात अपंगत्व असतं. यामध्ये कोपराखालचा किंवा मनगटाचा हात गमावलेले किंवा त्याच प्रकारचं कार्यक्षमतेचं नुकसान झालेले खेळाडू सहभागी होतात. मात्र, त्यांच्या पायांची कार्यक्षमता सामान्य असते. दिलीप म्हादू गावित यांचा उजवा हात ते अवघे पाच वर्षांचे असताना आंब्याच्या झाडावरून पडल्यामुळे कापावा लागला होता. त्यानंतर वयाच्या १७व्या वर्षी त्यांनी प्रशिक्षक वाजीनाथ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲथलेटिक्समध्ये कारकिर्दीला सुरुवात केली.
सुमारे सहा वर्षांपूर्वी एका स्थानिक स्पर्धेत वाजीनाथ काळे यांची दिलीपवर नजर पडली होती.
ङ्गप्रामाणिकपणे सांगायचं तर, त्यावेळी तो काही उत्कृष्ट धावपटू नव्हता किंवा त्याच्यात काही वेगळं दिसलं नव्हतं. म ात्र, या मुलाला खेळात स्वतःला सिद्ध करण्याची योग्य संधी मिळायला हवी, असं मला वाटलं. त्यासाठी त्याला औपचारिक आणि योग्य प्रशिक्षण मिळणं गरजेचं होतं,ङ्घ असं काळे यांनी २०२१ मध्ये एका मुलाखतीत सांगितलं होतं.
दरम्यान, रौप्यपदक विजेता मोहम्मद बासिल याचा जन्मच उजव्या हाताशिवाय झाला होता. केरळच्या बासिलने वयाच्या १६व्या वर्षी स्प्रिंटिंगला सुरुवात केली. २०२६ हे वर्ष त्याच्यासाठी निर्णायक ठरलं. सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याने २०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. विशेष म्हणजे, राष्ट्रकुल स्पर्धेच्या निवड चाचणीत (उथऋ ढीळरश्री) टी४६–टी४७ अंतिम फेरीत बासिलने १०.६४ सेकंदांची वेळ नोंदवत दिलीप गावितला मागे टाकलं होतं. मात्र, ग्लासगोतील अंतिम शर्यतीत दिलीप गावितने दमदार पुनरागमन करत १०.७१ सेकंदांच्या वेळेसह सुवर्णपदक जिंकलं.
या ऐतिहासिक कामगिरीसह दिलीप म्हादू गावित राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पॅरा ॲथलेटिक्समध्ये सुवर्णपदक जिंकणारा पहिला भारतीय पुरुष खेळाडू ठरला. तसेच, महिलांच्या शॉटपुट एफ५७ प्रकारात शर्मिला धनकर हिने मिळवलेल्या सुवर्णपदकानंतर पॅरा ॲथलेटिक्समध्ये राष्ट्रकुल स्पर्धेचं सुवर्णपदक जिंकणारा तो एकूण दुसरा भारतीय पॅरा खेळाडू ठरला.

# आगामी आयसीसी वर्ल्ड कप २०२७ मध्ये होणार मोठे बदल?

मुंबई–आयसीसी वर्ल्ड कप २०२७ सुरू होण्यासाठी अजून खूप वेळ असला , तरी स्पर्धेच्या स्वरुपावरून क्रिकेट विश्वात चर्चा रंगली आहे. वर्ल्ड कप २०२७ दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया संयुक्तपणे आयोजित करणार आहेत. आयसीसीने नव्या स्पर्धा स्वरुपाची घोषणा झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाचे मुख्य प्रशिक्षक अँ मॅकडोनाल्ड यांनी आयसीसीशी मागणी केली आहे की, वर्ल्ड कप २०२७ साठी १५ ऐवजी १७ खेळाडूंचा संघ ठेवण्याची परवानगी देण्यात यावी. आयसीसीने जाहीर केलेल्या नव्या फॉर्मेटनुसार एखादा संघ फेरीपर्यंत पोहोचला तर त्याला तब्बल १५ सामने खेळावे लागतील. इतक्या मोठ्या स्पर्धेत खेळाडूंना दुखापत, खेळपट्टीतील बदल आणि विविध परिस्थितींचा सामना करावा ला–गणार आहे. त्यामुळे केवळ १५ खेळाडूंचा संघ अपुरा ठरू शकतो, असे मॅकडोनाल्ड यांचे मत आहे. त्यांच्या मते, १७ खेळाडूंचा संघ असल्यास संघ व्यवस्थापनाला विविध परिस्थितीनुसार संघरचना बदलण्याची अधिक संधी मिळेल आणि दुखापतींमुळे संघाची ताकद कमी होणार नाही.या मागणीबाबत बोलताना अँड्रू मॅकडोनाल्ड म्हणाले, ''कोणतीही स्पर्धा खेळताना तुम्हाला तुमच्या महत्त्वाच्या खेळाडूंशिवाय मैदानात उतरायचे नसते. सर्वोत्तम खे–ळाडू संपूर्ण स्पर्धेत उपलब्ध रा–हावेत, ही प्रत्येक संघाची इच्छा असते.'' ते पुढे म्हणाले की, १७ खेळाडूंच्या संघाला परवानगी मि ळाल्यास निवड समिती सर्वोत्तम १७ खेळाडूंची निवड करू शकेल. एखादा खेळाडू दुखापतग्रस्त झाल्यास किंवा खेळपट्टी आणि परिस्थितीनुसार बदल करण्याची वेळ आल्यास संघाची गुणवत्ता फारशी कमी होणार नाही.

### हार्दिक पांड्या सीएसकेम ध्ये सामील होणार?

मुंबई–आयपीएल २०२७ च्या आगामी सिझनमधील अनेक महत्वाच्या अपडेट्स समोर आल्या आहेत. मागील काही दिवसांपासून सातत्याने हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्सची साथ सोडणार असे अनेक दावे सोशल मिडियावर केले जात आहे. हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्स सोडून सीएसकेच्या संघामध्ये जाणार असे सांगितले जात आहे. मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याच्या बाबतीतला सर्वात मोठा वाद चर्चेत असल्याची अफवा आहे. मुंबईने त्याला ट्रेड करण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त आहे. चेन्नई सुपर किंग्सनंतर, आता दिल्ली कॅपिटल्स या शर्यतीत आघाडीवर असल्याचे दिसत

# आयसीसी क्रमवारीत वैभवची हनुमान उडी

दिल्ली–भारतीय क्रिकेट संघाचा युवा सलामीवीर फलंदाज वैभव सूर्यवंशी, जो आपल्या पहिल्या तीन टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये फलंदाजीत चांगली कामगिरी करु शकला नव्हता, त्यानं झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी–२० मालिकेतील दोन सामन्यांमध्ये शानदार अर्धशतकं झळकावली. या कामगिरीमुळं वयाच्या १५ व्या वर्षी वैभव सूर्यवंशीला सामना–वीर आणि मालिकावीर पुरस्कार मिळाला. आता, आयसीसीनं जाहीर केलेल्या ताज्या टी–२० फलंदाजी क्रमवारीत वैभव सूर्यवंशीनं मोठी झेप घेतली आहे. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेनंतर तो २७८ व्या क्रमांकावर होता आणि आता त्यानं थेट ४८व्या क्रमांकावर झेप घेतली आहे.
वैभवनं घेतली मोठी झेप, तर अभिषेक शर्माला मोठा फटका : झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी–२० मालिकेत, १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीनं दोन अर्धशतकं आणि ५०.३३ च्या प्रभावी सरासरीनं एकूण १५१ धावा केल्या, ज्यामुळं तो एकूण ५३६ रेटिंग गुणांसह आयसीसी टी–२० फलंदाजी क्रमवारीत ४८व्या स्थानावर पोहोचला आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या इतर भारतीय खेळाडूंच्या क्रमवारीबद्दल बोलायचं झाल्यास, एकूण १४५ धावा करणारा इशान किशन ९१० रेटिंग गुणांसह अव्वल स्थानी कायम आहे. दरम्यान, टीम इंडियाचा सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्मा, ज्याचं



क्रमवारीत दीर्घकाळ वर्चस्व होतं, त्याच्या क्रमवारीत घसरण झाली असून तो ८१९ रेटिंग गुणांसह तिसऱ्या स्थानावर आला आहे.
तिलक वर्मानंही आयसीसी टी–२० फलंदाजी क्रमवारीत केली सुधारणा : इंग्लंडविरुद्धच्या टी–२० मालिकेत खराब फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाचा उपकर्णधार तिलक वर्मानं, झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेत तीन डावांत ७७ धावा केल्या आणि अर्धशतकही झळकावलं. परिणामी, तिलक वर्मानं इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूक आणि जॉस बटलर यांना मागे टाकत, ७५० रेटिंग गुणांसह आपल्या क्रमवारीत सुधारणा करुन सहावं स्थान पटकावलं आहे.

# झिम्बाब्वे दौरा गाजवल्यानंतर वैभव सूर्यवंशीकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी!


मुंबई–आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सध्या एकच नाव तुफान गाजतंय, ते म्हणजे वैभव सूर्यवंशी. १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीला इंग्लंडविरुद्ध झालेल्या टी–२० मालिकेत पदार्पण करण्याची संधी दिली गेली होती. त्यानंतर त्याने झिम्बाब्वेविरुद्ध झालेली टी–२० मालिका गाजवली. आता भार–तात परतल्यानंतर त्याच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आगामी दुलीप ट्रॉफी स्पर्धेसाठी ईस्ट झोन संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी इशान किशनकडे सोपवण्यात आली आहे. तर उपकर्णधारपदाची जबाबदारी वैभव सूर्यवंशीकडे सोपवण्यात आली आहे.
दुलीप ट्रॉफी स्पर्धेसाठी स्थान देण्यात आलेल्या ईस्ट झोनच्या संघात मोहम्मद शमी आणि मुकेश कुमारसारख्या अनुभवी फलंदाजांना स्थान देण्यात आलं आहे. या दोघांनाही श्रीलंकेविरुद्धच्या टी–२० मालिकेसाठी भारतीय संघात स्थान देण्यात आलेलं नाही. त्यामुळे दोघेही भारतीय संघात पुनरागमन करण्याच्या प्रयत्नात असणार आहे. ईस्ट झोनच्या संघात वैभव सूर्यवंशी अभिमन्यू ईश्वरनसोबत डावाची सुरुवात करताना दिसून येऊ शकतो.वैभव सूर्यवंशीने आयपीएल स्पर्धा गाजवली आहे. पण देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याला आपली छाप सोडता आलेली नाही. त्याला प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये आतापर्यंत ८ सामने खेळण्याची संधी मि ळाली आहे. यादरम्यान त्याने १२ डावात १७.२५ च्या सरासरी–ने २०७ धावा केल्या आहेत. यादरम्यान ९३ धावा ही त्याची सर्वोत्तम खेळी आहे. आता दुलीप ट्रॉफी स्पर्धेत वैभव सूर्यवंशी कशी कामगिरी करणार याकडे सर्वांचं लक्ष लागून असणार आहे. या स्पर्धेसाठी अभिमन्यू ईश्वरन, म ोहम्मद शमी, मुकेश कुमार आणि शाहबाज अहमदसारख्या स्टार खेळाडूंनाही संघात स्थान देण्यात आलं आहे.तसेच रणजी ट्रॉफी स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या शिखर मोहनला राखीव खेळाडू म्हणून संघात स्थान देण्यात आलं आहे. कर्णधार इशान किशन नेतृत्वासह यष्टीरक्षकाची भूमिका पार पाडताना दिसेल. तर बॅकअप यष्टीरक्षक म्हणून कुमार कुशाग्रला देखील संघात स्थान देण्यात आलं आहे.

# फक्त १२ हजार लोकसंख्या असलेल्या देशाने जिंकली ३३ पदके!

दिल्ली–२०२६ च्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत, पॅसिफिक महासागरातील एक लहान बेट राष्ट्र असलेल्या नौरुनं पुन्हा एकदा सिद्ध केलं की खेळातील यश हे लोकसंख्या किंवा संसाधनांवर अवलंबून नसतं. सुमारे १२,००० लोकसंख्या असलेल्या या देशातील १७ वर्षीय वेटलिफ्टर, फॅमिली क्रिस्टी नॉटेनं, महिलांच्या ६३ किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकून इतिहास रचला. तिच्या या कामगिरीमुळं नौरुला चालू स्पर्धेत केवळ दुसरं पदकच मिळालं नाही, तर राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात देशाच्या एकूण पदकांची संख्या ३३ वर पोहोचली.
१४ सदस्यीय संघ स्पर्धेत सहभागी : एकूण २१६ किलो वजन उचलणाऱ्या फॅमिली क्रिस्टी नॉटेनं स्पर्धेत तिसरं स्थान पटकावलं. या तरुण खेळाडूनं दबावाखाली उत्कृष्ट कामगिरी केली

### १७ वर्षीय खेळाडूने रचला इतिहास

आणि पदक मिळवून आपल्या देशाला सन्मान मिळवून दिला. हे यश विशेष आहे कारण ती केवळ १७ वर्षांची आहे आणि तिनं आपल्या कारकिर्दीच्या इतक्या सुरुवातीच्या टप्प्यातच आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठं यश मिळवलं आहे. नौरुचा १४ सदस्यीय संघ ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये सहभागी होत आहे. देशाचे खेळाडू ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, ज्युडो आणि वेटलिफ्टिंग यांसारख्या स्पर्धांमध्ये भाग घेतात. मात्र, वेटलिफ्टिंगमधील उत्कृष्ट कामगिरी ही नौरुची सर्वात मोठी ओळख ठरली आहे. फॅमिली क्रिस्टीसाठी हे कांस्यपदक याच परंपरेचा एक भाग ठरले.
सर्वात लहान देशांपैकी एक : नौरु जगातील सर्वात लहान देशांपैकी एक



मानला जातो. २००२ च्या जनगणनेनु–सार, त्याची लोकसंख्या केवळ ९,८७२ होती आणि आजही ही संख्या १२,००० पेक्षा कमी असल्याचा अंदाज आहे. एवढी कमी लोकसंख्या असूनही, या देशानं क्रीडाविश्वात आपलं वेगळेपण सिद्ध केलं आहे. मर्यादित संसाधनं आणि खेळाडूंची संख्या कमी असूनही, नौरुनं आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सातत्यानं आपला ठसा उमटवला आहे. नौरुनं १९९० मध्ये पहिल्यांदा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भाग घेतला. तेव्हापासून, देशानं प्रत्येक राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत किमान एक पदक जिंकलं आहे. विशेष म्हणजे, पहिल्या चार राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये नौरुनं किमान एक सुवर्णपदक जिंकलं. कोणत्याही लहान देशासाठी हा विक्रम खूप विशेष मानला जातो.
विशेष म्हणजे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत नौरुनं जिंकलेली सर्व ३३ पदकं केवळ वेटलिफ्टिंगमधूनच मिळाली आहेत. याचा अर्थ असा की, या लहानशा देशानं आपली संपूर्ण क्रीडा ओळख एकाच खेळावर उभारली आहे. हे यश दाखवून देतं की, योग्य नियोजन, समर्पण आणि प्रतिभेला संधी मिळाल्यास, मर्यादित संसाधनं असूनही जागतिक यश मिळवता येते. क्रिस्टी नॉटचं यश हे खेळाडूंच्या भावी पिढ्यांसाठी एक प्रेरणास्थान आहे. तिनं हे सिद्ध केलं आहे की, वय आणि देशाचा आकार हे खेळाडूची क्षमता ठरवत नाहीत. या १७ वर्षीय वेटलिफ्टरच्या कामगिरीनं हा संदेश दिला आहे की, कठोर परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वासानं जगा–तील सर्वात मोठ्या क्रीडा मंचांवरही इतिहास घडवता येतो. ग्लासगोमध्ये जिंकलेल्या या कांस्यपदकानं नौरुच्या

# यंत्र हे मानवाची जागा घेऊ शकत नाही : मा. श्री. रमेश बियाणी




महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी (MSFD-), पुणे आणि दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQ-C) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ई-कंन्टेंट डेव्हल्पमेन्ट एड एआय इन इज्युकेशन या पाच दिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रमात मार्गदर्शन करताना दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांनी सांगितले की, यंत्र हे मानवाची जागा घेऊ शकत नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही शिक्षण, संशोधन आणि प्रशासनासाठी प्रभावी सहाय्यक ठरू शकते; मात्र मानवी विचारशक्ती, सर्जनशीलता, नैतिक मूल्ये आणि निर्णयक्षमता यांची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही. ते पुढे म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात शिक्षकांनी (AI) चा योग्य आणि जबाबदारीने वापर करून अध्यापन अधिक प्रभावी, आकर्षक आणि विद्यार्थी-केंद्रित करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे शिक्षकाचे पर्याय नसून त्यांचे सामर्थ्य वाढविणारे साधन आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे सहाय्यक साधन आहे. मानवी सर्जनशीलता, मूल्ये आणि संवेदनशीलता कायम महत्वाची आहे. असे सांगून सर्व सहभागी प्राध्यापकांचे विशेष कौतुक केले. दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता ही शिक्षकांची प्रतिस्पर्धी नसून प्रभावी सहकारी आहेत असे प्रतिपादन करून सदरील कार्यक्रमात ई-कंटेंट निर्मिती, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल अध्यापन आणि आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यावर सविस्तर मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील संगणकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कबीर खराडे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि ई-कंटेंट निर्मितीमुळे उच्च शिक्षण अधिक प्रभावी, संवादात्मक आणि भविष्योन्मुख होत असल्याचे प्रतिपादन केले. उपस्थित प्राध्यापकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड,दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. पशांत दिक्षीत व एम.एस.एफ.डी.ए. पुणे यांच्या समन्वयक प्रितम दरेकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. राजू मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन खट-उ समन्वयक डॉ. संतोष पाटील, तसेच विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्टॅच्यू ऑफ नॉलेज लातूराच्या वैभवात भर घालणारा ठरेल - स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले

## पुतळा उभारणी अनुषंगाने मनपा सदस्यांचा विजयवाडा व हैद्राबाद येथे अभ्यास दौरा

**लातूर/प्रतिनिधी:** स्टॅच्यू ऑफ नॉलेज लातूराच्या वैभव भारतरत्न डॉ. बाबाबासाहेब आंबेडकर यांचा ऐतिहासीक पुतळा अर्थात स्टॅच्यू ऑफ नॉलेजची उभारणी लातूरात होत आहे. सदर पुतळा भव्य दिव्य व्हावा अशी प्रत्येक लातूरकरांची अपेक्षा आहे. या अपेक्षांची पुर्तता करण्यासाठी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सुचने नुसार मनपा सदस्यांनी विजयवाडा व हैद्राबाद येथीली पुतळ्याची पाहणी करुन अभ्यास दौरा केला. त्या अनुषंगाने लातूरात उभारला जाणारा भारतरत्न डॉ. बाबाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अर्थात स्टॅच्यू ऑफ नॉलेज भव्य दिव्य होऊन लातूरच्या वैभवात भर घालणारा ठरेल असा विश्वास या अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी व्यक्त केला आहे.

लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क च्या मैदानावर स्टॅच्यू ऑफ नॉलेजची अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळ्याची उभारणी करण्यात येत आहे. सदर पुतळा केवळ लातूर जिल्ह्यासाठीच नव्हे तर संपुर्ण मराठवाड्यासाठी वैभव ठरावा अशी अपेक्षा प्रत्येक लातूरकरांकडून व्यक्त होत आहे. त्या अनुषंगाने माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सुचना नुसार महापौर जयश्री सोनकांबळे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे यांच्या सह मनपा सदस्यांच्या शिष्टमंडळाने विजयवाडा व हैद्राबाद येथे अभ्यास दौरा केला.

विजयवाडा या ठिकाणी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा १२५ फुटी पुतळा आणि ८५ फुटी चबूतरा असे एकूण २१० फूट उंच पुतळा उभारण्यात आलेला आहे, तर हैद्राबाद येथे १२५ फुटी पुतळा आणि ५० फुटी चबूतरा असा एकूण १७५ फुट पुतळा उभारला आहे. विजयवाडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याची माहिती देण्यासाठी सभागृहाची उभारणी ही करण्यात आली आहे. लातूर मनपा सदस्यांनी पुतळा परिसरासह या सभागृहाची सविस्तर माहिती घेत त्याचा अभ्यास केला. या सर्व परिसराची माहिती विजयावाडाच्या जिल्हाधिकारी डॉ. लक्ष्मी शहा यांच्यासह मनपा अधिकाऱ्यांनी दिली.



सदर पुतळा आणि हा परिसर चांगले पर्यटन स्थळ म्हणुन विजयावाडा जिल्ह्यासह आंध्र प्रदेश राज्यात प्रसिद्ध आहे. त्याच बरोबर हैद्राबाद येथील ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा तितकाच आकर्षक आणि भव्य दिव्य आहे. यामुळे विजयवाडा व हैदराबादच्या अर्थचक्राला गती मिळाली असल्याने याच धर्तीवर लातूर येथे स्टॅच्यू ऑफ नॉलेजची उभारणी करुन तो लातूरच्या वैभवात भर घालणारा ठरावा असा मानस सर्वच मनपा सदस्यांनी व्यक्त केला आहे.या अभ्यास दौऱ्यात वंचित बहुजन आघाडीचे गटनेते अमोल लांडगे, कॉग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक प्रा. शिवाजी जवळगेकर, विकास वाघमारे, अॅड अतिश चिकटे, अॅड मनोज थोरात, सचिन गायकवाड, मंगेश सोनकांबळे, गोरिबी बागवान, धोंडोराम यादव, सतीश साळुंके, विकास कांबळे, विनय जाकते, प्रदीप मोरे, ऋषिकेश राजे, अॅड बाबा पठाण, नगरसेविका प्रेरणा होनराव, जरीनाबी शेख, करुणा शिंदे यांच्यासह लातूर मनपा अधिकारी वर्गाचा समावेश होता.

# राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराजांच्या पायी दिंडीत प्लास्टिकमुक्त भारताचा संकल्प




**उदगीर/प्रतिनिधी:** गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या भक्ती स्थळ, अहमदपूर येथे जाणाऱ्या पायी दिंडी यात्रेदरम्यान सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी या अभियानांतर्गत पर्यावरण जनजागृतीचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. यावेळी दिंडीत सहभागी झालेल्या भाविक भक्तांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी प्लास्टिकला नकार - कापडी पिशवीचा स्वीकार हा संदेश देत प्लास्टिक कॅरीबॅगच्या वापरामुळे पर्यावरण, जलस्रोत, पशुपक्षी आणि मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती भाविकांना देण्यात आली. कापडी पिशवीचा वापर हा पर्यावरण संरक्षणासाठी प्रभावी पर्याय असल्याचे सांगून प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात प्लास्टिकला कायमचा नकार देण्याचे आवाहन करण्यात आले.

उपस्थित सर्व भाविकांना प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर न करण्याची शपथ देण्यात आली. श्रद्धा आणि सामाजिक जबाबदारी यांचा संगम घडवत स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिकमुक्त भारत घडविण्याचा निर्धार भाविकांनी व्यक्त केला.

या उपक्रमास त्र्यंबक आप्पा माळेवाडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुबस माळेवाडे, कार्यकारी संपादक मनोज पटवारी, दिंडी प्रमुख वीरभद्र तरगुडे, रतिकांत आप्पा स्वामी तसेच मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. उपस्थितांनी या सामाजिक उपक्रमाचे मनापासून स्वागत करत पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय सहभागाची ग्वाही दिली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी सांगितले की, गुरुंची शिकवण केवळ अध्यात्मापुरती मर्यादित नसून समाजहित आणि निसर्गसंवर्धनाचाही संदेश देते. प्रत्येकाने प्लास्टिकचा त्याग करून कापडी पिशवीचा स्वीकार केला, तर हीच राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराजांना खरी गुरुदक्षिणा ठरेल.

या उपक्रमामुळे दिंडीतील भाविकांमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण झाली असून, 'आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी' या

# निलंग्यात विद्यार्थ्यांचा तिरंगा विजयी मार्च: विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य झाल्याने विजयोत्सव

**निलंगा/प्रतिनिधी:** केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य केल्याने आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यामुळे निलंगा येथे विद्यार्थ्यांच्या वतीने भव्य 'तिरंगा विजय मार्च' काढून विजयाचा जल्लोष करण्यात आला. काँग्रेसचे निरीक्षक बाळासाहेब देशमुख व जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मार्च काढण्यात आला.

जिजाऊ चौकातून सुरू झालेला हा मार्च छत्रपती शिवाजी महाराज चौकात संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी तिरंगा हातात घेऊन 'संविधानाचा विजय असो', 'विद्यार्थी एकजूट जिंदाबाद' अशा घोषणा दिल्या. मार्गावर नागरिकांनी विद्यार्थ्यांचे पुष्पवृष्टी करून स्वागत केले. या शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने मिळवलेल्या यशाबद्दल जिल्हाध्यक्ष साळुंके व बाळासाहेब देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. भविष्यातही काँग्रेस पक्ष विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी पाठीशी ठामपणे उभा राहील, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.

शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून, राष्ट्रगीत गायनाने व संविधानाच्या प्रस्ताविकेच्या सामूहिक वाचनाने मार्चचा समारोप झाला. याप्रसंगी डॉ. अरविंद भातांब्रे, प्रविण सूर्यवंशी, सुधाकर पाटील, अजित माने, विजयकुमार पाटील, शहीद पटेल, योगिता जाधव, अजित नाईकवाडे, डॉ. गजेंद्र तरंगे यांच्यासह इतर जि. प. व पं. स. सदस्य, काँग्रेसचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संविधानाच्या वाचनाने मार्चची झाली सांगता विद्यार्थ्यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी दिलेला लढा हा पूर्णपणे लोकशाही आणि संविधानिक मार्गाने होता, हे या विजय मार्चमधून अधोरेखित झाले. केवळ घोषणाबाजी न करता, या मार्चचा समारोप राष्ट्रगीत गायनाने आणि संविधानाच्या प्रस्ताविकेच्या सामूहिक वाचनाने करण्यात आला. शांततापूर्ण मार्गाने केलेल्या संघर्षाला यश मिळते, हा संदेश यातून देण्यात आला असून नागरिकांनीही विद्यार्थ्यांच्या या शिस्तीचे व संयमाचे विशेष कौतुक केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत दयानंद विज्ञानमध्ये एक दिवसीय मत्स्य व्यवसाय जनजागृती व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी:** मत्स्यव्यवसाय विभाग व दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत एक दिवसीय मत्स्य व्यवसाय जनजागृती व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि.३० जुलै २०२६, वार गुरुवार, सकाळी ठिक १०:०० वाजता करण्यात आलेले आहे.मत्स्यपालक, पारंपरिक मच्छिमार, मत्स्य सहकारी संस्थांचे सदस्य व विद्यार्थी तसेच मत्स्य व्यवसायाशी संबंधित सर्व लाभार्थ्यांसाठी आधुनिक मत्स्यपालन तंत्रज्ञानाचा लाभ मिळवून देण्यासाठी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,लातूर कार्यालयाकडून हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे.

सध्याच्या काळात मत्स्य व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे काळाची गरज बनली आहे.याच पार्श्वभूमीवर या प्रशिक्षण कार्यक्रमात आधुनिक मत्स्यपालन तंत्रज्ञान,आधुनिक जाळी व बोटींचा वापर,मत्स्य हाताळणी व काढणीनंतरचे व्यवस्थापन,मत्स्य विपणन अशा विविधांगी विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे.या प्रशिक्षण शिबिरामुळे लातूर परिसरातील मत्स्यपालक व व्यावसायिकांना आपल्या व्यवसायाची आधुनिक पद्धतीने वाढ करण्यास मोठी मदत होणार आहे. तरी जास्तीत जास्त मत्स्यपालक आणि संबंधित घटकांनी या प्रशिक्षण शिबिरात सहभागी व्हावे,असे आवाहन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, विभागीय उपायुक्त मत्स्य व्यवसाय, लातूरचे शिरिष गाताडे,सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय तेजस्विनी करळे, विभाग प्रमुख डॉ.रवी सोळुंके व डॉ.सुरज कोल्हे यांच्यामार्फत करण्यात आलेले आहे.

# प्रा.डॉ.बालाजी शिंदे यांच्या संशोधनाला भारत सरकारकडून पेटंट



**लातूर/प्रतिनिधी:** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील मराठी विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. बालाजी नारायण शिंदे आणि त्यांचे सहकारी संशोधक डॉ.यादव मोरे यांनी भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडे भाषा शिकण्याचे उपकरण या विषयावरील उपकरणाचे सादरीकरण केले होते. त्यांच्या या नावीन्यपूर्ण संशोधनासाठी भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट मंजूर करण्यात आले व अधिकृत पेटंट प्रमाणपत्र त्यांना प्रदान करण्यात आले आहे. हे त्यांचे कार्य त्यांच्या साहित्यिक प्रतिभेची, संशोधननिष्ठेची आणि मराठी भाषा - संस्कृतीप्रती असलेल्या समर्पणाची गौरवशाली पावती आहे.डॉ.बालाजी शिंदे यांनी केलेल्या या संशोधनामुळे भाषा शिकण्यासाठी सुलभता येणार आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ.राम बोरगावकर यांनी त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला❊ .याप्रसंगी सुप्रसिद्ध सिनेपार्श्वगायक मंगेशभैया बोरगावकर, प्र.प्राचार्य डॉ.पांडुरंग गोरे,प्रा. डॉ. वसंत बंडे, प्रा. रवि चव्हाण, डॉ. सुदाम पवार, डॉ.मोनालिसा खानोरकर,प्रा.ज्योती मामडगे,प्रा.तुकाराम येमले,डॉ.राम खलंग्रे, प्रा.श्रीमंत दोरवे, प्रा.सलील शहाजिंदे,श्री.शशिकांत सोळुंके, प्रा.अमोल जाधव, श्री. विठ्ठल चव्हाण, श्री.बाळू आडगळे, श्री.कोंडीराम कागले,श्री.बळीराम कदम, सौ.भागीरथी लाड यांनी त्यांच्या या नाविन्यपूर्ण संशोधनाचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले आहे.

# सुरक्षित इंटरनेट वापरासाठी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा प्रशिक्षण

बाभळगाव : राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत दयानंद विद्यालय बाभळगाव लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले. दि. २८ जुलै २०२६ रोजी सकाळी १२:०० ते ०१:१२ या वेळेत झालेल्या या सत्रात इयत्ता आठवी ते दहावीच्या २५० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर वॉरिअर जाधव योगिता आणि सायबर वॉरिअर बोरूळे प्राजक्ता यांनी फोटो मॉर्फिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)च्या माध्यमातून फोटो तयार करण्याची प्रक्रिया, एआयचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर, मजबूत परवलीचा शब्द (पासवर्ड) तयार करण्याचे महत्त्व याबाबत उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही प डाउनलोड करताना कोणत्या परवानग्या द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याशिवाय ऑनलाइन फसवणूक, बनावट संकेतस्थळांच्या दुव्यांपासून सावध राहणे, ओटीपी फसवणूक, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर तसेच डिजिटल गोपनीयतेचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिंदे गोविंद सुदामराव यांचे मार्गदर्शन लाभले. आयोजनासाठी बोचरे मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनावे, असे आवाहन करण्यात आले

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या मराठवाडा विभागीय सचिवपदी अरुण लोखंडे यांची निवड!



जळकोट (विजय पिसे)- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई या राज्यातील अग्रगण्य पत्रकार संघटनेच्या मराठवाडा विभागीय सचिव / संपर्कप्रमुख या महत्त्वपूर्ण पदावर तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ज्येष्ठ पत्रकार श्री. अरुण लोखंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संघटनेचे प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी आणि राज्य संघटक संजय भोकरे यांच्या सूचनेनुसार, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी अधिकृत नियुक्ती पत्र देऊन ही घोषणा केली.

पत्रकार संघाचे ध्येय-धोरण आणि उद्दिष्टे लक्षात ठेवून मराठवाडा विभागात संघटना अधिक मजबूत करण्यासाठी व पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी श्री. लोखंडे हे नेहमी प्रयत्नशील राहतील, असा विश्वास संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

श्री. अरुण लोखंडे यांच्या या नियुक्तीबद्दल पत्रकार संघ, विविध सामाजिक संस्था, राजकीय तसेच प्रशासकीय वर्गातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील वाटचालीसाठी त्यांना उदंड शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# पाऊस असतानाही जिल्हाभरातून हजारो आंबेडकरी अनुयायांचा मोर्चा



धाराशिव (प्रतिनिधी)-दिलंय भीमान, खा गुनाणं',उपवर्गीकरण करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो', जय भीम, जय संविधान', अशा गगनभेदी घोषणा, भीमगीतांचा ताल, निळ्या झेंड्याचा झगमगाट, हातात घोषवाक्यांचे फलक घेऊन शिस्तबद्ध पद्धतीने चालणारे हजारो भीमसैनिक त्यात धो धो पडणारा पाऊस, अशा वातावरणात धाराशिवमध्ये मंगळवारी उपवर्गीकरणविरोधी मोर्चा जल्लोषात काढण्यात आला. मोर्चाचे नेतृत्व रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, कृती समितीचे समन्वयक धनंजय शिंगाडे यांनी केले.

अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या सरकारच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी येथे आंबेडकरी जनतेच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. मोर्चा राष्ट्रमाता जिजाऊ चौकातून दुपारी दोन वाजता धो-धो पावसात सुरू झाला. सुरुवातीपासूनच मोर्चात रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर, मोर्चाचे मुख्य आयोजक धनंजय शिंगाडे, अमित आनंदराज आंबेडकर, चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष महादेव गायकवाड, राजाभाऊ ओव्हाळ, कैलास शिंदे, नितीन शेरखाने, संजय बनसोडे, डी. जे. हौसलमल आदी सहभागी झाले होते. मोर्चाच्या सुरुवातीपासूनच मोठ्या प्रमाणात पावसाला सुरुवात झाली होती. तरीही जिल्हाभरातून आलेल्या आंबेडकरी जनतेत प्रचंड उत्साह व जल्लोष दिसून येत होता. मोर्चात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत मोठ्या प्रमाणात नागरिक सहभागी झाले होते. मोर्चाचे रूपांतर जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आल्यानंतर मोठ्या सभेत झाले. पावसातही सभा सुरूच होती. अशा मोठ्या प्रमाणात पडणाऱ्या पावसामध्येही मोर्चेकरांचा जल्लोष थोडाही कमी झाला नाही. मुसळधार पावसाच्या सरी कोसळत असतानाही हातात निळे ध्वज घेऊन नागरिकांचा मोर्चात जोरदार जल्लोष दिसून येत होता.

अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण तत्काळ रद्द करणे, बद्दर समिती त्वरित बरखास्त करणे, जातीनिहाय जनगणना करणे, महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित करणे, अनुसूचित जाती-जमातीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती थेट बँक खात्यात जमा करणे, बार्टी महामंडळाचे संचालक सुनील वारे यांना पदावरून हटवून सक्षम प्रशासकाची नियुक्ती करणे, रमाई आवास योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी लाभार्थींना १० लाखांपर्यंत अनुदान देणे, खासगीकरण व कंत्राटीकरणाचे धोरण रद्द करून कायमस्वरूपी रोजगाराला प्राधान्य देणे तसेच महात्मा फुले महामंडळाच्या कर्जाची संपूर्ण कर्जमाफी करणे आदींसह विविध मागण्या केल्या.

महिला, वृद्ध नागरिक तसेच युवक-युवतींचा पावसामध्ये जोरदार जल्लोष दिसून येत होता. प्रचंड उत्साहामध्ये डोक्यावर निळी टोपी परिधान करून व गळ्यात निळा पंचा घालून अनेक महिलाही मोर्चामध्ये सहभागी झाल्या होत्या. धाराशिव शहरात सध्या रस्त्याची अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत. यामुळे विविध ठिकाणी पडलेले खड्डे, विखुरलेली खडी याची कोणतीही तमा न बाळगता मोर्चेकरी उत्साहाने मोर्चात सहभागी झाले होते. मोर्चाची वेळ दुपारी बाराची दिली असतानाही दोन वाजता मोर्चा सुरू करण्यात आला

आंबेडकर यांनी स्पष्ट केले की, संपूर्ण राज्यात उपवर्गीकरणाला विरोध होत आहे. इतके करूनही सरकारने उपवर्गीकरण केले तर जंतरमंतरवर नुकत्याच झालेल्या विद्यार्थी आंदोलनाप्रमाणे दिल्ली येथेच उग्र आंदोलन केले जाईल. सर्वोच्च न्यायालयही सध्या वेगळेच वागत आहे. शेवटी जनतेचे न्यायालय देशात अंतिम असल्याचे अनेक आंदोलनात दिसून आले आहे.

उपवर्गीकरणाला अनुसूचित जातीतील सर्व घटकांचा विरोध आहे. केवळ बौद्ध समाजाचा विरोध नाही, असे सांगून चर्मकार महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष नितीन शेरखाने म्हणाले की, उपवर्गीकरणाचा निर्णय झाला तर भाजप, आरएसएसच्या नेत्यांना, मंत्र्यांना राज्यात फिरू दिले जाणार नाही. त्यांचे प्रत्येक कार्यक्रम उधळून लावण्यात येतील. हा लढा केवळ एक दोन जातीतील लोकांचा नाही, ५९ जातींतील वंचितांचा हा लढा आहे. आम्हाला ललकारू नका, भाजपसह सर्वच नेत्यांना ही खेळी जड जाईल.

# पायी जात असताना अपघात एकाचा मृत्यू

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे-धोंडीराम मोहनराव चांदीवाले, वय ४५ वर्षे, रा. लखनगाव ता. भालकी जि. बिदर राज्य कर्नाटक हे दि.०७.०६.२०२४ रोजी ००.३० वा. सु. उमरगा शिवारातील बायपास रोडवरील शोर्यवाडा हॉटेल जवळील हायवे रोडवरुन पायी जात होते. दरम्यान अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे चालवून धोंडीराम चांदीवाले यांना धडक दिली. या अपघातात धोंडीराम चांदीवाले हे गंभीर जखमी होवून मयत झाले.

पोस्टे उमरगा आ.मृ. क्र ४४/२०२४ मधील चौकशीमध्ये फिर्यादी नामे-भाग्यश्री धोंडीराम चांदीवाले, वय ४० वर्षे, रा. लखनगाव ता. भालकी जि. बिदर राज्य कर्नाटक यांनी दि.२८.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.द. वि.सं. कलम २७९, ३०४(अ), ३३८ सह १८४, १३४ (अ)(ब) मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा कांता चॅरिटेबल ट्रस्टचा सेवाभावी उपक्रम



मुरूम (सुधीर पंचगल्ले) कंटेकुर, तालुका उमरगा येथे कांता चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मंगळवारी (ता. २९) रोजी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या बॅग व शालेय शिक्षणासाठी आवश्यक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले असून पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी ट्रस्टच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. हा उपक्रम कांता चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक धनराज जाधव, सचिव नूपुर जाधव यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला. शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा पाया आहे, या विचारातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेची बॅग तसेच शालेय शिक्षणासाठी आवश्यक साहित्य मोफत वितरित करण्यात आले. साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उत्साह हा या उपक्रमाचे खरे यश ठरला.

याप्रसंगी धनराज जाधव यांनी समाजसेवा ही केवळ मदत नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी असल्याचे सांगितले. शिक्षण, आरोग्य, शेतकरी सहाय्य, युवकांना प्रोत्साहन तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य कांता चॅरिटेबल ट्रस्ट सातत्याने करत असल्याचे त्यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मोलाची मदत मिळाली असून समाजात शिक्षणाबाबत सकारात्मक संदेशही पोहोचला. उपस्थितांनी कांता चॅरिटेबल ट्रस्टच्या या सेवाभावी कार्याचे कौतुक करत भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी सरपंच विजयाबाई जमादार, मुख्याध्यापक लक्ष्मीकांत पटणे, जीवन सूर्यवंशी, चित्ररेखा दंडे, लक्ष्मीबाई शिकारे, लतिफ लदाफ, लक्ष्मण येवते, विजयकुमार कलशेट्टी, शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष राजश्री निंबर्गे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष कमलाकर पांचाळ, उपाध्यक्ष राम मुडगे, केंद्रप्रमुख बबिता महानुर, पोलीस पाटील लक्ष्मण पांचाळ, श्रीहरी पाटील, आशा सेविका लक्ष्मी घोडके, शकुंतला जमादार, महादेव बिराजदार, बालाजी जमादार, बालाजी जाधव, रसुल मुजावर, आप्पाराव पाटील, बसवेश्वर निंबर्गे, लक्ष्मण निंबर्गे, मुरळीचे माजी सरपंच इमरान पटेल, तंटामुक्ती समितीचे उपाध्यक्ष मुबारक मोजणीदार, मुस्ताक जमादार, इस्माईल पटेल, हसन मोजणीदार, राजेंद्र मुरलीकर, दीपक बिराजदार, बबलू पटेल, संभाजी कलबुर्गे, विश्वंभर सुरवसे, भरत जाधव, पुरुषोत्तम पिंपळे, पमू एकुरगे, शाम चौधरी, देवप्पा भाले, बबलू माने, दत्तात्रय प्रधाने तसेच शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फार्मर आयडीतील 'नो लँड डिटेल्स'ने लोहारा शेतकरी हैराण



लोहारा (प्रतिनिधी)- तालुक्यातील शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीवर जमिनीचा तपशील दिसत नसल्याने निर्माण झालेली तांत्रिक अडचण तातडीने दूर करावी, तसेच खरीप २०२५ हंगामातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून तांत्रिक त्रुटीमुळे वगळण्यात आलेल्या तीन महसूल मंडळांचा समावेश करून शेतकऱ्यांना विमा मंजूर करावा, अशी मागणी शिवसेना लोहारा तालुकाप्रमुख जगन्नाथ पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांना निवेदन दिले.

शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी, ई-पिक पाहणी, पीएम-किसान तसेच अन्य अनुदान योजनांसाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. मात्र, मागील काही दिवसांपासून लोहारा तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीवर ७/१२ व ८-अ वरील जमिनीचा तपशील दिसत नसल्याची समस्या निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या आयडीवर 'नो लँड डिटेल्स फाउंड' किंवा जमिनीचा तपशील शून्य दाखवला जात आहे.

फार्मर आयडीमधील जमिनीचा डेटा योग्य पद्धतीने फेच न झाल्यामुळे किंवा पोर्टलवरील तांत्रिक त्रुटींमुळे ही समस्या निर्माण झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग आणि संबंधित तांत्रिक यंत्रणेला आदेश देऊन बाधित शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीवरील जमिनीचा तपशील तातडीने अद्ययावत करावा. धानुरी, माकणी आणि जेवळी या महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना समान न्याय देऊन पीक विम्याची रक्कम मंजूर करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख जगन्नाथ पाटील, संजय रणखांब, अमोल सोमवंशी, आनंदसिंग बायस, उपतालुकाप्रमुख परमेश्वर साळुंके, युवा सेना तालुकाप्रमुख दत्ता मोरे, खंडू जाधव, श्रीकांत बिराजदार यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

फार्मर आयडीतील त्रुटींचा शेतकऱ्यांना फटका फार्मर आयडीवर जमिनीचा तपशील उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अडचणी येत आहेत. पीएम-किसान, पीक विमा, अनुदान तसेच ई-पिक पाहणीसाठी आवश्यक असलेली माहिती प्रणालीमध्ये उपलब्ध होत नसल्याने अर्ज प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत. अल्पभूधारक शेतकऱ्यांना या तांत्रिक त्रुटीचा मोठा फटका बसत असून, प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# तुळजापूरात देवदर्शनासाठी गेलेल्यांची लॅपटॉप व रोख रकमेची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-शितल कारभारी खर्डे, वय ३१ वर्षे, रा. दवणगाव सबस्टेशन शेजारी ता. राहुरी ता. अहिल्यानगर यांचे पती कारभारी खर्डे हे दि. २८.०७.२०२६ रोजी १०.०० ते ११.०० वा. सु. तुळजापूर शहरातील हॉटेल नारायणी समोरील बाजुचे रोडचे कडेवर भिंतीलगत तुळजापूर येथे गाडी पार्क करुन श्री तुळजाभवानी मंदीरात देवदर्शनासाठी गेले असता त्यांचे गाडीचा काच फोडून नुकसान करुन गाडीतील लिनीवो कंपनीचा लॅपटॉप व पर्स मधील रोख रक्कम ५,००० असा एकुण ३०,०००किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शितल खर्डे यांनी दि.२८.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२), ३२४(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was :**PATHAN MOHAMMAD MUSTAFA MOHAMMAD ABDUL SAMAD** TO: **PATHAN MOHAMMAD MUSTAFA KHAN MOHAMMAD ABDUL SAMAD KHAN**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **PATHAN MOHAMMAD MUSTAFA KHAN MOHAMMAD ABDUL SAMAD KHAN** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **PATHAN MOHAMMAD MUSTAFA MOHAMAD ABDUL SAMAD**
NEW NAME : **PATHAN MOHAMMAD MUSTAFA KHAN MOHAMMAD ABDUL SAMAD KHAN**
Address - 14/91 Sawar Galli Old Bharat Vidyalay Taluka Osmanabad DIST. Osmanabad. -413501
Adhar n.-795034272053 Mob.942293699953
Mob.9422936999


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649